महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

बीजेच्या चंद्रराया ....

देवाचा नावाडी..... नियंता..... होता विशाल जीवन....

विश्राम बेडेकर ....

'ज्ञ' आणि पुरुष ....

कविता ....

शेवटचे पान ....

कोल्टकरांच्या नाटकांचे रंभूमीवरील यशापयश ....

रात सरे, रवि उगवे ....

चोरबाजातील चिजा ....

औधोगिक वृत्तविशेष ....

महाविदर्भ साहित्य-सम्मेलन, गोंदिया ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बाळजी दप्तरी सदन ग्रंथालय
३७३९२
दाखल नोंद क्रमांक
दिनांक १०·२·९४
३
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

बीजेच्या चंद्रराया—

* * *

बीजेच्या चंद्रराया । निरोप घेऊनि जा ।
जा रे! माझिया माहेरा जा !
आज भाऊबीज माझी रे चंद्रा !
माया आतड्याची नेई माहेरा
ओढूनीया काळजा १

शुभ्र मेघावरी स्वार होवोनी
दौडत जाई रे! मनोवेगांनी
जाणूनि भाव माझा २

कृष्णाकाठीं गाव माझ्या पित्याचा
अजूनि दरारा त्यांच्या नावाचा
वाटसरा पूस जा ३

सात चौकी.वाडा उभा भावाचा
दरवाजा सांगेल कथा दिल्लीच्या
ऐकूनि जरा ये जा ४

मराठेशाहीच्या रक्षणासाठी
जागोजाग फुटे तटाची छाती
तीं लेणीं देखाया जा. ५

जीर्ण शीर्ण जरी नगारखाना
ऐक सनईच्या अस्पष्ट ताना
जागविती वंशजा ६

हळूच उतर उंच सौधावरी
ओलांड आरसेमहाल बिलोरी
पश्चिम–महालीं जा ७

सांगतें शशांका ! माझ्या भावाने
कष्ट सोशीयेलें देशाकारणें
शोभतो रे पूर्वजां ८

सांग भावाला, ओवाळीलें तुला
धारोष्ण दुधाचा ठेविला पेला
तूझिया आवडिचा ९

कुरवाळ करें माझ्या भाच्याला
कुशल विचार भावजयीला
हळूच बागेंत जा १०

देवघराच्या झरोक्यांतूनि
पहा आई बसे कर जोडोनी
करूं नको आवाजा ११

प्रार्थीत असेल प्रभुपायाशीं
" सुखी ठेव सदा माझ्या बाळांसी "
हाच रे ध्यास तिचा १२

अंजलींत बैस माझ्या मातेच्या
गूजगोष्टी सांग माझ्या जीवाच्या
संकोचूं नको राजा १३

माझ्या पाखरांचें कुशल सांग
आशीर्वाद तिचा त्यासाठी माग
प्रसाद नको दुजा १४

हीच घाल मज चंद्रा ! ओवाळणी
आण माहेराच्या गोड आठवणी
अवीट अमृताच्या १५

—पद्मा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दवाचा नावाडी—

झुलुक् झुलुक् डुबुक् डुबुक्
करीत चालला कोण हा नावाडी? १

वेगांत हाकारी दर्याच्या अन्तरीं
मनांत घाबरा होई ना हा जरा! २

गडाड् गडाड् मेघाचा घडाड्
कडाड् कडाड् वीजेचा खडाड्! ३

उंचशा आकाशीं फेकून लाटेशी
सागर—ताण्डव पाऊस वर्षाव! ४

प्रलय जाहला निसर्ग कोपला
नावेला हाकारी कर्तव्य पुकारी ५

कोठून आलेला! कोठे हा चालला!
–विचारा नावाडी! –देवाचा नावाडी!– ६

—चन्द्र सापत्नेकर.

●

नियंता—

फस फसव हास वा, हसव रडव वा,
खुशाल कर रुदन
जा दीप लाव वा मालव, जळ वा जाळ बेगुमान,
घे पदरीं दे वा स्तूप उभव, वा खण जा कबरीही,
नच काल थांबणें पळतां बचण्या तुझी कृती कांही!

आरंभ हाच जो अनादि आणिक अनंत हा अंत
हा प्राण कलेवर, विनाश विकसन महाशक्तिवंत
शाश्वत अशाश्वत करी प्रबळ हा लीलेने नित्य
आंधळा जरी हा प्रकृतिनियमें अणु उचली, सत्य!
चालवी युगांची ये-जा हा जो साक्षात् चैतन्य
संहार हा करी स्रष्टा याहुनि परमेश न अन्य!
वर शाप न दे हा यजमाना! तव निष्फळ बघ यज्ञ
नास्तिका! नियंता घे जाणुनि हा असशी जरि सूज्ञ!

—द. चिं. सोमण

●

होतां विशाल जीवन—

हिरे माणिक मोत्यांचा
चित्तिं नुपजला हेवा!
नक्षत्रांच्या वैभवाचा
माझ्या मनाला विसावा! १

वस्त्रें अमोल मोलाची
भरजरी पीतांबर!
तुच्छ सर्व हीं जीवाला
वृत्ति होतां दिगंबर· २

माझें भूमिचें आसन
शुभंकर, निरंतन!
कसें लोभविल माझें
मन राजसिंहासन! ३

विभवाचें नि सुखाचें
असें उघडें भांडार!
होतां विशाल जीवन
सुखमय हा संसार! ४

—ना. मा. सरपटवार

●

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विश्राम बेडेकर

पां. चि. करकरे

● 'ब्रह्मकुमारी' व 'रणांगण' या उत्कृष्ट नाटक-कादंबरीचे कर्ते आणि 'पहिला पाळणा' यासारख्या पहिल्या प्रतीच्या बोलपटाचे लेखक-दिग्दर्शक या नात्यांनी रा. विश्राम बेडेकर यांनी अतिशय किर्ती संपादन केलेली आहे. अलीकडील पिढींतील अव्वल दर्ज्याच्या प्रतिभावंतांत बेडेकरांचा प्रामुख्याने समावेश कुणासहि करावा लागेल.

अशा थोर साहित्यिकाचा व कलावंताचा आठवणीवजा परिचय त्यांचे निकटचे स्नेही नागपूरचे वृत्तपत्र व्यवसायी रा. करकरे यांनी या लेखांत करून दिलेला आहे.

★ ★ ★

" हें पहा. सध्या माझ्या मनांत विचार एकच: पिक्चर्स ! पिक्चर्स ! पिक्चर्स ! चित्रपटांची रांगच्या रांग डोळ्यांसमोर नाचते आहे सारखी "- प्रथितयश कथालेखक आणि दिग्दर्शक रा. विश्राम बेडेकर यांनी माझ्या प्रश्नाला उत्तर म्हणून हे उद्गार काढले. बेडेकरांचा ज्या चित्रपटाशीं निकट संबंध होता, तो बलवंत-पिक्चर्स कॉर्पोरेशनचा पहिला वहिला 'कृष्णार्जुन युद्ध' हा बोलपट सपशेल पडल्यानंतरची ही आठवण आहे. आम्ही दोघे उमरावतीस कँपच्या रस्त्याने सहल करावयांस गेलो असतां चित्रपट व्यवसाय संबंधी आमचें बोलणें चालूं होतें, 'कृष्णार्जुन युद्ध' हा बोलपट त्या कंपनीच्या एकपरी मुळावरच आला होता. तेव्हा बेडेकरांचे वरील उद्गार ऐकून, 'काय घमेंडखोर माणूस आहे हा ! '-असा शेरा मारण्याचा मोह त्यावेळीं पुष्कळांना अनावर झाला असता. पण, मला तसें वाटलें नाही. त्यांच्या उद्गारांत मला आढ्यतेचा किंवा अतिशयोक्तीचा दर्प आला नाही. कारण, त्यांचा दुर्दम्य आशावाद आणि आत्मविश्वास यांची मला कल्पना होती व अपयशाला आव्हान देत सुटणारी त्यांची बेडर वृत्ति आणि आपल्या आवडत्या कार्यासाठी उत्कटतेनें अविश्रांत परिश्रम करण्याची त्यांची तयारी मला चांगली माहित होती. एकदा निर्धार करून मार्ग पत्करला की, बेडेकर त्यापासून सहसा ढळावयाचे नाहीत, याची मला खात्री होती. स्वतंत्र विचारशक्ति व निर्भयता हे त्यांचे दोन अक्षय्य साथी होते.

× × ×

एरवीं त्यांना नेहमीची चाकोरी सोडून स्वतंत्र मार्ग काढणें अशक्यप्राय होतें. त्यांचा सिनेमा-क्षेत्रांतला जीवनक्रम पाहतां, बेडेकरांचा जन्म दशग्रंथी वडिलांच्या पोटीं झाला आहे, हें अनेकांना खरेंहि वाटणार नाही ! परंतु, वस्तुस्थिति तशीच आहे. यजमानाच्या घरीं श्रावणीसारख्या धार्मिक समारंभांच्या प्रसंगीं समिधा, दर्भ यांची जुळणी करून व होमांत तूप ओतून वडिलांचे मदतनीस म्हणून काम करितांना बेडेकरांना मी पाहिलें आहे. आणि, हल्लीचा काल वेदाभ्यास करून नशीब काढण्याला अनुकूल नसला, किंवा तो जमाना कायमचा नष्ट झाला असला, तरी बेडेकरांनी म्हटलेंच असते, तर त्यांना प्राध्यापकाची सुखाची नोकरी पटकाविणें मुळीच कठीण नव्हतें. परंतु, त्यांना मळलेल्या वाटेने जावयाचेंच नव्हतें. त्यांच्यांत धोक्याचे पण मनाची आकांक्षा व खुमखुमी पुरविणारे प्रयोग करण्याची धडाडी होती. आपल्याला पटलेला-समजलेला जीवनक्रम लोकापवादाला भीक न घालतां, स्वीकारण्याची त्यांची तयारी होती. त्यांनी रुळलेला मार्ग साफ धिटकारिला आणि सिनेमा सृष्टींत धैर्याने व कृतनिश्चयाने पाऊल टाकलें.

× × ×

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अर्थात् निर्भयता व स्वतंत्र विचारशक्ति या त्यांच्या दोन्ही गुणांची जोपासना चांगली झाली होती. थेट विद्यार्थीदशेपासून या गुणांचा परिपोष होत गेला. पूर्ण विचारांतीं जो निर्धार झाला, तो तडीस नेतांना त्याचे बरे वाईट परिणाम निर्भयपणें भोगावयाचे, हें त्यांचें तेव्हाहि ठरून गेल्यासारखें होतें. त्यांच्या या स्वभाव-विशेषावर झगझगीत प्रकाश पाडूं शकतील, असे दोन प्रसंग येथें देण्यासारखे आहेत. बेडेकर तेव्हा इंटर सायन्समध्यें होते. विद्यापीठाची वार्षिक परीक्षा सुरू होती. बेडेकरांचा गणित (बहुधा गणितच) हा विषय, का कोण जाणे, कच्चा राहिला होता. इंग्रजीचे पेपर्स अर्थात् चांगले गेले. पण गणिताचा पेपर सोडविणें आपल्याला जमत नाहीं, हें बेडेकरांनी पहिल्या पंधरा–वीस मिनिटांतच ताडलें. बस्स ! त्यांचा निश्चय होऊन चुकला; " पेपर देण्यांत अर्थ नाही ! अपयश टळत नाही !" ते जेमतेम अर्धातास परीक्षेच्या हॉलमध्ये बसले असावेत. त्यांना तितका वेळ बसणें नियमाप्रमाणें भागच होतें. पर्यवेक्षकांनी त्यांनी जातों म्हटलें, तरी त्यांना जाऊं दिलें नसतें. परंतु, तेवढी वेळ उलटतांच बेडेकर जणु कांहीच झालें नाही--अशा मुद्रेने बाहेर आले आणि पोर्चपाशीं नोटीस बोर्डावरच्या नोटिसा चाळूं लागलें ! मी तेथेच होतो. मला साहजिकच आश्चर्य वाटलें. मी त्यांना विचारलें, " बेडेकर इतक्या लवकर आलांत ? " त्यावर ते झटकन् म्हणाले, " मग काय करूं ? पेपर सोडवितां येणार नाहीं, अशी बालंबाल खात्री पटल्यावर तेथे माशा कशाला मारीत बसूं ? " मी एकदम चमकलों, अशा समयीं सामान्यत: बहुतेक विद्यार्थी आशेच्या किरणांची वाट पहात शेवटपर्यंत बसतात. परंतु बेडेकरांचे सगळेंच मुलुखावेगळें ! तरी पण मी त्यांना हटकलें, " नाहक नुकसान करुन घेत आहांत तुम्ही बेडेकर ! जमूनहि गेला असतां पेपर आणखी थोडा वेळ कळ सोसली असती तर ! पुढच्या खेपेस तरी असें करूं नका ! " पण त्यांचें उत्तर एकच : " जमणार नाहीं मला तें ! खात्री आहे माझी त्या विषयीं ! " बेडेकरांनी एकदा नव्हे, दोनदा हा प्रयोग केला. घरची गरीबी, व बेडेकर हाच आई–वडिलांचा त्या वेळचा एकच एक आधार ! ही सारी परिस्थिति बेडेकरांना लख्ख दिसत होती. परंतु, एकदा विचार ठरल्यावर त्यांनीं या गोष्टी मध्यें येऊं दिल्या नाहीत. अर्थात् अन्य रीतींने म्हणजे शिकवणी-वगैरे करून ते पैसा मिळवीत व वडिलांना अप्रत्यक्ष साहय्य करीत, हा भाग वेगळा. आपल्या स्वतंत्र विचारा-मुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीचा त्यांच्यावर भार पडणार नाही, याची शक्य तितकी दक्षता ते सदैव घेत.

× × ×

असाच आणखी एक प्रसंग आठवतो. त्याची जात अर्थात्– थोडीसी वेगळी आहे. बेडेकर अमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजांत निघणाऱ्या मॅगॉझिनच्या मराठी विभागासाठी संपादक म्हणून निवडणुकीस उभे राहिले. त्यांच्या-विषयीं माझ्या मनांत स्नेहभाव वसत होता. त्यांच्या बुद्धीचें चीज व्हावें, त्यांना यशामागून यश मिळत जावें, त्यांचा योग्य तो आदर व्हावा, असें मला नेहमी वाटे. त्यांना अपयश यावे ही कल्पनाहि मला सहन होत नसे. परंतु या निवड-णुकींत त्यांना अपयश येईल, ही भीति मला भेडसावींत होती. त्यांच्याविषयीं एकतऱ्हेची आपुलकी वाटत असून देखील मी यावेळीं त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या मित्रमंडळींत वावरत होतो. संपादकाच्या जागेला हा उमेद-वारहि योग्य असाच होता. परंतु, बेडेकर हेंच कोणत्याहि विद्यार्थ्यापेक्षा त्यावेळी सरस होते. पण, 'लोकशाही' कोणाला केव्हा व कसा हात देईल, याचा नेम नाहीं ! शिवाय, बेडेकरांचा स्वभावहि तेव्हा अनेकांना अतोनात गर्विष्ठ वाटे ! यामुळे, अनेकजण मनांतल्या मनांत धुसफुसत असत. त्यांचा राग व असंतोष या निवडणुकीच्या निमित्ताने उफाळून येण्याचा दाट संभव होता. या सर्व कारणांमुळे बेडेकर निवडणुकींत पडतील,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असें मला भय वाटत होतें. त्यांच्या पदरीं अपयश येऊं नये, अशी माझी उत्कट इच्छा होती. पण विरोधी उमेदवाराच्या गटांत स्वतःला गोवून घेतल्यामुळे त्यांच्याविरुद्ध मत देणें हेंच माझें कर्तव्य होतें! या पेचांतून सुटण्याचा माझ्या दृष्टीनें एकच उपाय होता; व तो म्हणजे उमेदवारांत चुरस होऊं न देणें, निवडणूक अविरोध होईल अशी व्यवस्था करणें; पण प्रतिस्पर्धी गट त्याला–कबूल होईना! शेवटी, बेडेकरांनाच निवडणुकीपासून परावृत्त करणें हा एकच मार्ग उरला. म्हणून मी त्यांना सरळ खुल्या दिलाने म्हटलें, "बेडेकर तुम्हांला अपयश येऊं नये, अशी माझी उत्कट इच्छा आहे. पण, मी निराळ्या गटांत असल्यामुळे यावेळीं तुमच्याविरुद्ध मत नोंदवीन. तुम्ही अपयशाचे धनी होऊं नये, असें माझें तुम्हांला सांगणें आहे. पुढच्या वर्षी तुमच्या साठीच सर्वजण प्रयत्न करूं. यंदा तुमचा पाडाव होईल, असा रंग दिसतो आहे. तेव्हा तुम्ही वेळींच माघार घ्या"—असें मीं त्यांना परोपरीने सांगून पाहिलें. परंतु त्यांचा आत्मविश्वास जबर होता. शिवाय अपयशाला ते भीत नव्हते. त्याच्याकडे टक लावून पाहण्याची त्यांची तयारी होती! ते निश्चयपूर्वक म्हणाले, "तुम्ही स्नेहभावाची सूचना केलीत, त्याबद्दल तुमचे मनःपूर्वक आभार! पण ती सूचना मान्य करवत नाही, याबद्दल वाईट वाटतें! पराजयाला एवढें बिचकण्याचें काय कारण? बडेबड़े मुत्सद्दी नाहीत का निवडणुकींत पराभूत होत? मग माझेंच काय मोठेंसें!"—मला ही विचारसरणी पटत होती, किंबहुना, मी माझ्या उमेदवारीसाठी हाच युक्तिवाद केला असता. परंतु बेडेकरांची संपादकाच्या जागेसाठीं उभे राहण्याची सर्वथैव पात्रता असूनहि त्यांचा पराजय व्हावा, हा विचार मला असह्य होई! म्हणून मी त्यांनी निवडणुकींतून अंग काढून घ्यावें, यासाठी प्रयत्न केला. परंतु शेवटीं निवडणूक झालीच. मी अर्थात् बेडेकरांच्या विरुद्ध मत दिलें. कारण, मला गटनिष्ठा राखावयाची होती पण मौज ही कीं, निवडणुकीने बेडेकरांनाच अनुकूल असा कौल दिला! ते निवडून आले. परंतु त्यांनी अपयशाचें स्वागत करण्याची जी सिद्धता दर्शविली होती, तिचें महत्त्व कांही तेवढ्याने कमी होत नाही.

× × ×

पण, माणूस कितीहि निर्भय असला, त्याचा स्वाभिमान कितीहि जाज्वल्य असला, व त्याचा आत्मविश्वास कितीहि प्रबळ असला, तरी जीवनसंग्राम सुरू होतांच त्याचे हे गुण लोपतात, करपून जातात, किंवा सरदून तरी जातात असा दारुण अनुभव आहे. परंतु, यालाहि कांही कणखर निर्धाराचीं माणसें अपवाद असतात. त्यांचे हे गुण, प्रतिकूल परिस्थितीची जसजशी आच लागते, तसतसे प्रकर्षाने तळपूं लागतात. बेडेकर हे या दुसऱ्या वर्गांत मोडतात. त्यांना भीषण जीवनसंग्रामाची झळ मुळींच लागली नाही, असे म्हणतां येणार नाही. पण, त्याच बरोबर हेंहि खोटें नाही कीं, त्यांनीं आपलें स्वभाववैशिष्ट्य सहसा लोपूं दिलेलें नाही.

हिंदुस्थानभरच नव्हे, तर विलायतेंतहि ज्याची धवल कीर्ति फाकली आहे, अशा दिग्दर्शकाशी मुकाबला झाला असतांनाहि बेडेकर त्या प्रसंगाला पुरून उरले; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं त्या दिग्दर्शकावर आपली छाप बसविली. त्या विख्यात दिग्दर्शकाने त्यांना बोलपटासाठीं एक कथा लिहावयास सांगितली. बेडेकरांनी ती अपेक्षेच्या खूपच आधीं पुरी केली. अर्थातच दिग्दर्शक महाशय कांहीसे विस्मयचकित झाले. "हें पाणी कांहीं न्यारेंच आहे" हें त्यांनीं लागलीच हेरलें. परंतु, सहजासहजी शरणचिठ्ठी देण्याचा, प्रतिपक्षियाची पाठ थोपटण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांनीं बेडेकरांची कसोटी पाहण्याचा जणु विडा उचलला. त्यांनीं "हा भाग अनवश्यक, तोहि अनवश्यक आणि तो पण गैरसोयीचा असें म्हणत म्हणत बेडेकरांना त्यावर काट मारण्यास सांगितलें. बेडेकरहि त्यांच्या सुचनेनुसार लाल पेन्सिलीने तो तो भाग सपासप कापूं लागले. तेव्हा दिग्दर्शकाला आणखी चेव आला आणि त्यांनीं बहुधा डिवचणाऱ्या हेतूने, जो भाग खुद्द

त्यांना स्वतःला आवडला, तोहि गाळून टाकण्यास बेडेकरांना सांगितलें. तरीहि बेडेकर थंडच ! त्यांनी अगदी निर्विकार मनाने तोहि भाग निमूटपणें छाटून टाकला. त्या बरोबर दिग्दर्शक एकदम उसळून म्हणाले, "काय हो बेडेकर ! पैशासाठी साहित्यिक एवढी लाचारी पत्करतात ! तुमचा उत्तमांतला उत्तम भाग मी गाळून टाकावयाला सांगितलें, तरी तुम्हांला दिम्म नाही ! काय म्हणावें तुम्हां साहित्यिकांना ! आणि या मजकुराच्या जागीं दुसरा मजकूर तुम्हांला आतां कसा घालतां येणार ! "

हे त्यांचे शब्द हवेंत विरतात न विरतात–तोंच, वीज कडकडावी तसे बेडेकर गर्जले. ते म्हणाले, ": XXXX आतापर्यंत तुम्ही नामवंत दिग्दर्शक आणि मी तुमच्यापासून ती कला शिकण्यासाठी आलेला उमेदवार हें नातें आमच्यांत होतें. आणि, म्हणून बोलपटांत गैरसोयीचा, किंवा अनवश्यक असा जो भाग तुम्हांला वाटला, तो मी बिनतक्रार गाळून टाकण्यास तयार झालों. तुमचा अधिकार मी तेवढ्यापुरता केवळ —दिग्दर्शनकलेपुरता—मान्य केला. पण, तुम्ही आता तुम्हांला सर्वस्वी अनोळखी अशा क्षेत्रांत लुडबूड करूं चाहत आहांत. पण, मी ती चालूं देणार नाही. वाङ्मयांचें मूल्यमापन मी तुम्हांला करूं देणार नाही. आणि, तुम्ही द्रव्याची केवढीहि रास माझ्यापुढे आणून ओतली, तरी तो माझा हक्क मी तुम्हांला विकणार नाही ! तेव्हा साहित्यिकांना छेडतांना नीट विचार करीत जा." 'मी–मी' म्हणविणारांची ज्यांच्यापुढे बोबडी वळावी, ते दिग्दर्शक बेडेकरांच्या या बाणेदार व मार्मिक उत्तराने अगदी हतबुद्ध झाले ! त्यांना बोलणेंहि सुचेना ! इतक्यांत बेडेकरांनी दुसरी फैर झाडली. ते म्हणाले, "आणि, दुसरा मजकूर कुठला घालावयाचा, ही अडचण ज्याला कधी काळीं एखादीच नामी कल्पना स्फुरते त्याला ! ज्याच्या जवळ उत्तमोत्तम कल्पनांचा हुकमी रतीब देणारी कामधेनु आहे, त्याला ती चिंता कदापि शिवत नाही ! तेव्हा आता माझ्या कथेचें कसें होईल, ही चिंता तुम्हांला नको." बेडेकरांच्या या फैरीने दिगदर्शकांचा उरला सुरला आवेशहि निवाला व त्यांच्यावर बेडेकरांच्या प्रतिभेची पकड बसली.

× × ×

अर्थात्, या अभिमानास साजेसें बुद्धिवैभव बेडेकरांजवळ होतेहि व आहेहि. तेथे भाषेची नुसती आतशबाजी नाही. त्यांच्याशी थोडेबहुत संभाषण झालें, तरी त्यांच्या कुशाग्र बुद्धीची चमक नजरेस आल्याशिवाय राहत नाही. जगद्विख्यात चपलख बुद्धीचा पण वावदूक ग्रंथकार जॉर्ज बर्नार्ड शॉ यांचें एक छायाचित्र बेडेकरांच्या अभ्यासिकेंत मी बऱ्याच वर्षांपूर्वी (ते कॉलेजांत असतांना) पाहिलें होतें. त्यांचीच छाप,न कळत कां होईना, बेडेकरांवर पडली आहे, असें मला तेव्हाच वाटलें. आणि, माझा तो ग्रह आजहि बव्हंशीं कायम आहे. बेडेकरांच्या बोलण्या–वागण्यांत सूक्ष्म दृष्टीने पाहणाराला याचे प्रत्यंतर मिळावयाला अडचण पडूं नये. विशिष्ट ध्येयासाठीं स्थापन झालेल्या पुण्याच्या एका सुप्रसिद्ध महिला संस्थेंतील नामवंत कार्यकर्त्याला त्यांच्या अवखळ बुद्धीची चुणूक दिसली, तेव्हा ते एवढे हजरजबाबी व तल्लख बुद्धीचे प्राध्यापक असूनहि गारीगार झाले. आमच्या संस्थेसाठीं कांही भरीव आर्थिक मदत मिळवावी, या हेतूने तें प्राध्यापक बेडेकरांकडे गेले. संभाषण गमतीने चाललें होतें. त्या ओघांत बेडेकर म्हणाले, आणि, असं पहा ! आमचा पैसा किती झाला तरी तुमच्या दृष्टीनें कलंकितच ! कारण, आम्ही सिनेमा क्षेत्रांत कामं करून पैसा मिळविणारे लोक. तेव्हा आमच्या पैशाने तुमच्या संस्थेला बट्टा लागणार नाही काय ? "– त्यावर प्राध्यापक कांहीसे गांगरले; पण लगेच सावरून म्हणालें, " छे ! छे ! आम्ही तुम्हाला तसें बिलकूल समजत नाही. तुम्हाला आम्ही बहिष्कृत मानीत नाहीं. तुमच्या पैशाला कसला आला आहे विटाळ ! " प्राध्यापकांना वाटले की, बेडेकर आता सपशेल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चीत होणार. परंतु बेडेकरांच्या तीक्ष्ण बुद्धीची त्यांना अजून पुरती ओळख व्हावयाची होती. बेडेकर यांनी त्यावर लागलीच हसत हसत विचारलें, "असें जर तुम्हाला वाटत असेल, तर फारच छान! तुमच्या आमच्या सहकार्याची एक योजना तुम्हांला मी सुचवितों. पहा, पटली तर! आम्ही तुमच्या संस्थेला भरीव मदत करावी व तुम्ही आम्हांला तुमच्या संस्थेतील एक विद्यार्थिनी नटी म्हणून द्यावी. अर्थात् तिचें त्यासाठी मन वळवावें." बिचारे प्राध्यापक! ते बेडेकरांच्या या योजनेवर काय बोलणार!

× × ×

या प्रांतांतील एका कलामंडळाच्या प्रमुखालाहि त्यांच्या खोचदार भाषणशैलीचा मागे यासारखाच अनुभव आला होता, असें ऐकिवांत आहे. या प्रमुखाने नाट्यबोलपट-कलासमितीसाठी तज्ज्ञ म्हणून बेडेकरांची शिफारस केली. बेडेकरांना हें कळलें, तेव्हा ते बहोत खूष होऊन जातील, अशीच सामान्यत: अपेक्षा असणार. परंतु, अनुभव अगदी निराळा आला. बेडेकरांनी त्या प्रमुखाला धन्यवाद देण्याऐवजी चांगलेंच छेडलें! अर्थात् विनोदानेच त्यांनी विचारलें, "अहो! तुम्हांला माझें नाव सुचविण्याचा अधिकार कसा काय पोंचतो! तुम्हां लोकांना या कलेचें पुरेसें ज्ञान नाही, असें तुम्ही स्वत:च म्हणतां; आणि तरीहि मी तज्ज्ञ असल्याचें मला प्रशस्तीपत्र खुशाल बहाल करतां! कांही सुमार तुमच्या धोरणाला— बोलण्याला!"

× × ×

बेडेकर अशी चतुर संभाषणाची स्मोहारी कारंजीं उडवू शकतात, म्हणूनच ते अनेकांना हवेहवेसे वाटतात. ते रंगांत आल्यावर त्यांचें संभाषण म्हणजे एक थाटाची मेजवानी वाटते. पण, त्याच बरोबर हेंहि खरें की, त्यांच्या या खोचदार मार्मिक संभाषणशैलीने अनेकजण दुखावले जाण्याचाहि संभव असतो. बेडेकरांना हें कळत नाही, असें नाही. त्यांनी संयम अधिक पाळला, तर त्यांच्या बुद्धीचें व कर्तृत्वाचें होत आहे त्यापेक्षा नि:संशय जास्त व हमखास चीज होईल. पण स्वभावाला औषध नाही, हेंच खरें! आता या आठवणींचेंच पहाना! त्या सांगितल्या, हें बेडेकरांना रुचेलच, असें नाही. फक्त त्यांचा त्यांनी इन्कार केला नाही, म्हणजे मिळविली!

● ● ●

'ज्ञ' आणि 'पुरुष'

वि. वा. करंबेळकर एम्. ए,
साहित्याचार्य, वेदान्ततीर्थ

● सांख्य शास्त्रांत 'ज्ञ' ही अर्धवट राहून गेलेली औपनिषद् कल्पना आहे. पण भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकास मात्र 'ज्ञ' म्हणजे परमात्मा व अद्वैत परब्रह्म यांतील दुवा वाटतो.

—हा मुद्दा या लेखांत नागपूरचे तरुण विद्वान् रा. करंबेळकर यांनी मांडला आहे.

* * *

सांख्य हें द्वैतमूल तत्त्वज्ञान आहे ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. प्रकृति आणि पुरुष हीं या शास्त्राचीं मूलभूत तत्त्वें आहेत. त्यांपैकीं प्रकृति ही जड व पुरुष तद्विरुद्ध आहे. सत्त्व, रजस्, व तमस् मिळून प्रकृति; तिच्या मूलभूत स्वरूपांत तिलाच अव्यक्त म्हणतात. आकाश, वायु, तेज, जल, पृथ्वी हीं तिचीं व्यक्त स्वरूपें आहेत, म्हणून 'व्यक्त' हेंहि तिचेंच नाव. प्रकृतीच्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मूलस्वरूपांत सत्वादि तीन गुणांची साम्यावस्था असते, पण कोणत्या तरी निमित्ताने[१] त्यांत वैषम्य उत्पन्न झालें, म्हणजेच व्यक्त वस्तु दृग्गोचर होतात. ‘ प्रधा ’, ‘ प्रसवधर्मिणी ’ वगैरे प्रकृतीचीं दुसरीं नांवें आहेत. आपल्या गुणांचा ती क्षोभ करते, म्हणून तिला ‘ गुणक्षोभिणी ’ असें म्हणतात; व्यक्त सृष्टीचीं बीजें ती धारण करते, म्हणून ‘ बहुधानक ’ असेंहि तिचेंच नाव आहे; व व्यक्त सृष्टि ती निर्माण करते, हें तिचें ‘ प्रसवधर्मिणी ’ नाव पडण्याचें कारण आहे.

पुरुष हा प्रकृतीहून निराळा म्हणजे चेतन, उदासीन, अकर्ता व निर्गुण आहे. प्रकृति अंध तर पुरुष साक्षी आहे. पुरुष हा जरी अकर्ता असला तरी प्रकृति, त्याच्याच संसर्गाने ही सर्व व्यक्त सृष्टि—गाय ज्याप्रमाणें आपल्या वत्साकरिता दूध निर्माण करते,[२] किंवा जल ज्याप्रमाणें लोकोपकाराकरितां आपोआप वाहतें[३] किंवा नटी ज्याप्रमाणें प्रेक्षकांपुढे अभिनय-प्रदर्शन करते[४]—त्याच्यापुढे निर्माण करूं लागते. निर्गुण पुरुषापुढे त्रिगुणात्मक प्रकृति ही एखाद्या आरशाप्रमाणे असते. त्यामुळे प्रकृतीचे गुण ते आपलेच गुण असा त्याला भ्रम उत्पन्न होतो.[५] या भ्रमानेच तो प्रकृतीच्या जाळ्यांत अडकतो व आपण सुखी, दुःखी—वगैरे आहोंत, अशा कल्पना करूं लागतो. कैवल्य म्हणजे सुखदुःखादिभावातीतत्व, किंवा एकटेपणा ही त्याची नैसर्गिक अवस्था आहे. ही अवस्था प्राप्त करून घेण्यासाठी त्याला अव्यक्त, व्यक्त व ज्ञ यांचें भेदज्ञान व्हावें लागतें.[६] सांख्यतत्त्वज्ञानाच्या मताने हें भेदज्ञानच पुरुषाची संसारबंधनापासून मुक्तता करण्याचें एकमेव साधन किंवा मोक्ष आहे.

वरील विवेचनावरून सांख्यशास्त्राची प्रक्रिया व सिद्धांत आपणांस थोडक्यांत कळून येतात. पण, हा ‘ ज्ञ ’ कोण कीं, ज्याचें ज्ञान पुरुषाच्या मुक्तीकरतां आवश्यक आहे व जो फक्त शेवटच्या क्षणींच उपस्थित होतो ! ईश्वरकृष्णाच्या कारिकांत ‘ ज्ञ ’ ची व्याख्या कोठेंच आलेली हाने कारिका २ मध्ये जेथे हा शब्द आला आहे, त्यांतील ‘ व्यक्त ’ व ‘ अव्यक्त ’ या परिचित शब्दांवरून हा ‘ ज्ञ ’ म्हणजे पुरुषच असला पाहिजे, हें आपणांस अनुमान करावें लागतें. ७२ कारिकांच्या सांख्य-शास्त्रांत ‘ ज्ञ ’ हा शब्द फक्त एकदाच म्हणजे दुसऱ्या कारिकेंत आला आहे. त्यानंतर मग मात्र त्याचा कोठेंच मागमूस नाहीं. जर ‘ ज्ञ ’ म्हणजे ‘ पुरुष ’ असेल, तर पुरुष शब्दाऐवजी मधून कांही ठिकाणीं तरी त्याचा उपयोग यावा, अशी अपेक्षा करणें योग्य होईल; कारण ‘ पुरुषा ’-ऐवजीं ‘ पुमान् ’ शब्दाचा उपयोगहि क्वचित् आढळतो.[७] सर्व कारिकांत एकंदर सोळापेक्षा कमी वेळां ‘ पुरुष ’ शब्दाचा उल्लेख केलेला नाहीं; आणि जर कारिकाकाराच्या मनांत असतें, तर त्याने ‘ पुरुषा ’ ऐवजीं ‘ ज्ञ ’ शब्दाचा उपयोग केला असता. परंतु ज्याअर्थी त्याने पद्धतशीरपणें ‘ ज्ञ ’ शब्द एकदाच वापरून पुन्हा वापरण्याचें टाळलें, त्याअर्थी कारिकाकाराच्यामतें ‘ ज्ञ ’ आणि ‘ पुरुष ’ हे एकमेकांचें पर्याय नव्हेत, असें ठरतें. त्यामुळे ‘ ज्ञ ’ आणि ‘ पुरुष ’ या दोन कल्पनांत काय भेद आहे, इकडे लक्ष्य दिलें पाहिजे.

प्रत्येक शास्त्राची कांही परिभाषा ठरलेली असते व त्या शास्त्रांतील विचार पारिभाषिक शब्दांच्या साह्यानेच प्रकट केलेले असतात. प्रधान, पुरुष, गुण, लिंग वगैरे सांख्य शास्त्रांतील पारि-भाषिक शब्द आहेत; त्याच प्रमाणें, ‘ ज्ञ ’ हाहि पारिभाषिक शब्द असल्यामुळे वरवर जरी ‘पुरुष’

---

१ या संबंधी शंकराचार्यांनी दोष काढला आहे. पहा—शारीरक सूत्रभाष्य २—२—४ पान. २२३ (निर्णयसागर प्रत)

२ कारिका ५७. ३ शारिरकसूत्र २-२-३ ४ कारिका ५९. ५ महाभारत शांति—२०·४८ ६ कारिका ८.

७ कारिका—११. ८ कारिका—३, १७, १९, ३१, ३७, ४८, ५६, ५८, ५९ वगैरे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

आणि 'ज्ञ' एकच आहेत, असें वाटलें, तरी त्या प्रत्येकाचे कांही विशिष्ट शास्त्रीय अर्थ असणें साहजिक आहे.

ईश्वरकृष्णाच्या कारिकांवरील टीकाकारांच्या टीकांवरून 'ज्ञ' आणि 'पुरुष' यांच्यांतील भेदाकडे लक्ष्य दिलेलें आढळत नाही. २ ऱ्या कारिकेवर टीका लिहितांना गौडपादवगैरेंची पुढील मतें आहेत.

गौडपाद—"स कथमित्याह व्यक्ताव्यक्तज्ञ-विज्ञानात् तत्र व्यक्तं महदादि ······। अव्यक्तं प्रधानम् । ज्ञ: पुरुष: ।

वाचस्पति—"व्यक्तंचाव्यक्तञ्चज्ञश्च व्यक्ता-व्यक्तज्ञा: । तेषां विज्ञानं विवेकेन ज्ञानं, यक्तज्ञान-पूर्वकमव्यक्तस्य तत्कारणस्यज्ञानं, तयोश्च पारार्थ्ये-नात्मा परोज्ञायत इति ।

नारायणतीर्थ—"व्यक्तं भूतादि, अव्यक्तं प्रधानं,ज्ञ: पुरुष:,एषां विविच्य ज्ञानात्भवतीत्यर्थः ।

कारिकांत 'ज्ञ' फक्त एकदाच आलेल असल्यामुळे टीकाकारांनी 'पुरुषाहून' तो भिन्न आहे काय, हें दाखविण्याची खटपट केलेली दिसत नाही. परंतु जरी टीकाकारांनी हें ज्ञ-पुरुषांतील भेदज्ञान मांडण्याची संधि गमावली असली, किंवा ज्या शास्त्रावर टीका करावयाची त्यांतील दोषोद्धाटन करणें योग्य नाही असें मनांत आणून तो रस्ता त्यांनी सोडून दिला असला, तरी 'ज्ञ' व 'पुरुष' यांच्यांत फरक आहे व 'ज्ञ' शब्द मुद्दामच दुसऱ्या कारिके-नंतर गाळण्यांत आला, असें समजण्यास पुरेसा पुरावा उपलब्ध होऊं शकतो. ज्या दुसऱ्या कारिकेंत 'ज्ञ' शब्द आला आहे, ती कारिका अशी—

दृष्टवदानुश्रविक: स ह्यविशुद्धिक्षयातिशय युक्त: ।
तद्विपरीत: श्रेयान् व्यक्ताव्यक्तज्ञ विज्ञानात् ॥

येथे मनुष्यास संसारबंधनापासून जो मोक्षाचा मार्ग दाखविला आहे, त्याच ठिकाणीं नेमका 'ज्ञ' उपस्थित झाला आहे. म्हणजे, ईश्वर-कृष्णानें आपल्या शास्त्राची प्रक्रिया सांगतांना पुरुष शब्दाचा उपयोग करून मोक्ष मिळवि-ण्याच्या वेळीं मात्र 'ज्ञ' चें ज्ञान करून घेतलें पाहिजे, असें दर्शविलें आहे,

प्रा. जे. एन्. मुकर्जी यांनी आपल्या 'The Theory of Reality' या पुस्तकांत प्रथमच 'ज्ञ' आणि 'पुरुष' यांतील भेद दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे.* त्यांच्या मतें सांख्यशास्त्रांतील 'पुरुषाची' कल्पना थोडीशी घोटाळ्याची आहे. तेव्हा त्यांनी आपल्या मताला उपोद्बलक कोणता पुरावा दिला आहे, तो आपण पाहूं. त्यांनी सांख्य, कारिकांवरील टीकांचा तुलनात्मक अभ्यास करून 'ज्ञ' हा 'पुरुषाहून' वेगळा आहे, इतकेंच नव्हें, तर 'पुमान्' हि पुरुषाहून वेगळा आहे, असें मत मांडलें आहे.*

पुरुषाचें वर्णन कारिका ३, ११, १७, १८, १९ इत्यादींत आलें आहे. त्यांत एके ठिकाणीं 'पुरुष' हा प्रकृतीहि नव्हे आणि विकृतीहि नव्हे, असें सांगितलें आहे. प्रकृति ही त्रिगुणात्मक असल्यामुळे विकृतीहि तशीच असली पाहिजे. पुरुष हा दोघींहून विपरीत आहे, म्हणजे 'त्रिगुणातीत'[९] आहे. व्यक्त आणि प्रधान हीं त्रिगुण, अविवेकी, विषय, सामान्य, अचेतन आणि प्रसव-धर्मी आहेत, पण पुरुष हा 'तद्विपरीतस्तथाच पुमान्'[१०] 'The spirit though similar, is yet the reverse of these' म्हणजे पुरुष हा अव्यक्तहि असतो व व्यक्तदशेंत त्रिगुण, अविवेकी, विषय ... असाहि असतो. या प्रमाणे पुरुष हा एकाच वेळीं व्यक्त व अव्यक्ताशीं समान व असमान असा असतो. या 'तद्विपरीतस्तथाच पुमान्' वर टीकाकारांनी आपल्या टीकांत जो घोटाळा उत्पन्न करून ठेवला आहे, तो पाहण्यासारखा आहे. गौडपाद–'अनेकं व्यक्तं

* Prof G. N. Mukerji –'The Theory of Reality' chap. VIII.

९ कारिका १७. १० कारिका ११

*Prof. Mukerji–'The Theory of Reality' P. 58.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकमव्यक्तं तथाच पुनानप्येक: । आश्रितं व्यक्तं अनाश्रितमव्यक्तं तथा च पुमाननाश्रित: । लिङ्गं व्यक्तं अलिङ्गं प्रधानं तथा च पुमानप्यालिंङ्ग: । न चक्वचिल्लीयत इति । सावयवं व्यक्तं निरवयवमव्यक्तं तथाच पुमान्निरवयव: । न हि पुरुषे शब्दादयोऽवयवा: न सन्ति । किञ्च परतंत्रं व्यक्तं स्वतंत्रमव्यक्तं तथा च पुमानपि स्वतंत्र: आत्मन: प्रभवति । ” वाचस्पति–स्यादेतदरेतुमत्वानित्यत्वादिप्रधानसाधर्म्यमप्यास्ति पुरुषस्य, एवमनेकत्वव्यक्त साधर्म्यम्, तत्कथमुच्यते ‘ तद्विपरीतस्तथाच पुमान् ’ । तथा च चकारोऽप्यर्थ: । यद्यपि अहेतुमत्वादिकं साधर्म्यं तथाप्यत्रैगुण्यादि वैपरीत्यमस्त्यैव ” नारायणतीर्थ— “ अधुना व्यक्ताव्यक्तयो: पुरुषस्यच साधर्म्यं वैधर्म्यं चाह तद्विपरीतस्तथा च पुमानिति ’ ताभ्यां व्यक्ताव्यक्ताभ्यां विपरीत: विरूप:निर्गुणत्वात् निर्विषयत्वात् नि:सामान्यत्वात्, चेतनत्वात्, अप्रसवधर्मित्वाच्च तथा अव्यक्तसरूपोऽपि अहेतुमत्वादिना, एवं व्यक्तसरूपोऽपि अनेकत्व संख्येयेति ।

वरील उताऱ्यांवरून टीकाकारांत एक मत नाही, हें उघड दिसतें. एकाच्या मतें ‘ तथाच ’ म्हणजे पुरुषाचें अव्यक्ताशीं एकत्वाच्या दृष्टीने साम्य, तर इतर दोघांच्या मतें पुरुषाचें व्यक्ताशीं अनेकत्वाच्या दृष्टीने साम्य. असा मतभेद का असावा ? त्यामुळे सांख्यांच्या ‘ पुरुष ’ कल्पनेबद्दल संशयास जागा आहे.

त्याचप्रमाणें, ‘ त्रिगुणविपर्ययात् ’ हें पुरुषाचें अनेकत्व सिद्ध करण्यासाठी एक कारण दिलें आहे.[११] पुरुष स्वत: त्रिगुणविपरीत आहे; त्रिगुणत्व जें अनेकत्वाचें कारण आहे, तें पुरुषाच्या ठिकाणीं नसतेंच. त्यामुळे त्रिगुणविपरीतत्व पुरुषाचें एकत्वच सिद्ध करील, अनेकत्व नाही. असें असून देखील त्रिगुणविपरीतत्व हें पुरुषाच्या अनेकत्व-सिद्धीकरिता कारण म्हणून दिलें आहे. वाचस्पति आणि गौडपाद यांच्याहि दृष्टीस हा दोष आला, पण मल्लिनाथी मनोवृत्तीने त्यांनी ‘ स्थितस्य गति: समर्थनीया ’ या न्यायाने त्या दोषाचें कसें तरी समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु खरें पाहिलें असतां पुरुष हा प्रधानाच्या त्रिगुणत्वाशीं भ्रमामुळे अभेद कल्पतो.[१२] त्यामुळे गुणांच्या कमीअधिक प्रमाणांत त्याच्या ठिकाणीं अनेकत्व उत्पन्न होतें. म्हणजे अनेकत्व उत्पन्न होण्याचें खरें कारण ‘ भ्रम ’ हें मानावयास हवें. *

त्याचप्रमाणें ‘ त्रिगुणविपर्यास ’ हें पुरुषाचें कैवल्य सिद्ध करण्यास कारण दिलेलें आहे.[१३] सर्व विश्वसनीय भाषान्तरांत गौडपाद व वाचस्पति यांच्या तंत्राने कैवल्य शब्दाचें भाषांतर ‘ freedom from misery ’— दु:खांतून मुक्तता–असें केलें आहे. पण तें समाधानकारक वाटत नाही. कारण कारिकेंत कैवल्याच्या पुढचाच शब्द ‘ माध्यस्थ ’ हा असून त्याचा अर्थ ‘ सुख-दु:खाविषयीं उदासीनता ’ हा आहे. म्हणजे कैवल्य व मध्यस्थ यांचे अर्थ जवळ जवळ एकच होतात. गौडपाद आणि वाचस्पति यांनी दोन शब्दांच्या अर्थांत थोडा तरी फरक भासावा, या दृष्टीने शब्दरचना केली आहे. परंतु खरें पाहिलें असतां ‘ कैवल्य ’ शब्दाचा अर्थ ‘ एकत्व ’ असा आहे; वेदान्तशास्त्रांत त्याचा याच अर्थांत उपयोग केलेला आढळतो. पण जर कैवल्य म्हणजे एकत्व असा अर्थ केला, तर कारिका १८ व १९ यांमध्ये विरोध उत्पन्न होतो. पहिलींत त्रिगुणविपरीतत्व हें पुरुषाचें अनेकत्व सिद्ध करतें व दुसरींत तेंच कारण त्याचें एकत्व सिद्ध करतें.

याप्रमाणें कारिकांतील विरोध व टीकाकारांतील मतभेद या कारणांनी सांख्यांच्या पुरुष–कल्पनेंत कांही घोटाळा आहे, हा संशय दुणावतो.

‘ पुरुष ’ शब्द कारिकांतून अनेक अर्थांत वापरलेला आढळतो. कांही ठिकाणीं त्याचा अर्थ

---

११ कारिका १८. १२ कारिका ४०.

१३ कारिका—१९. * See how Prof. Mukerji puts this argument– ‘ The Theory of Reality ’ pp. 58–59,

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'परमात्मा' असा होतो, तर कांही ठिकाणीं संसारबंधनांत अडकलेला 'जीवात्मा' असा होतो. उदाहरणार्थ—

'तस्माच्च विपर्ययात्सिद्धं साक्षित्वमस्य पुरुषस्य।
कैवल्यं माध्यस्थं द्रष्टृत्वमकर्तृभावश्च॥" १४

येथे परमात्मा, तर

जननमरणकरणानां प्रतिनियमादयुगपत्प्रवृत्तेश्च।
पुरुष बहुत्वं सिद्धं त्रैगुण्यविपर्ययाच्चैव।१५

येथे जन्ममरण–शरीर–वगैरे उपाधि ज्याच्या मागे लागल्या आहेत, असा पुरुष शब्दाचा अर्थ होतो. वर उद्धृत केलेल्या दोन कारिकांतील 'पुरुषांची' जर तुलना केली, तर त्यांतील विशेषणांवरून हे दोन 'पुरुष' वेगळे आहेत, असें मान्य करावें लागतें. उदाहरणार्थ, 'अकर्तृभाव' जर एकाचें विशेषण आहे, दुसऱ्या कारिकेंत वर्णन केलेल्या अनेक पुरुषांचा 'प्रवृत्ति'—म्हणजे अगदी विरोधी गुण—हा विशेष आहे. पहिला जर संसारातीत आहे, तर दुसरींत वर्णन केलेले पुरुष संसारबंधनांत पडलेले आहेत.

जर पहिल्या कारिकेंत[१६] वर्णन केलेला संसारातीत पुरुष म्हणजे 'ज्ञ' असेल, तर त्याच्या ठिकाणीं बहुत्व येणें अनुपपन्न ठरतें; कारण हा असामान्य व अविषय आहे. जर याच्या ठिकाणीं बहुत्व आलें, म्हणजे जर असे पुरुष पुष्कळ असले, तर ते एकमेकांस जाणतील, किंवा जाणणार नाहीत. जर ते एकमेकांस जाणतील, तर त्यांच्या ठिकाणीं असामान्यत्व व अविषयत्व कोठून येणार? बरें, जाणणार नाहीत म्हणावें, तर त्यांच्या 'ज्ञ' त्वाची काय वाट? यावरून अठराव्या कारिकेंत नमूद केलेलें बहुत्व 'ज्ञ' पुरुषाचें नसून 'लिङ्गपुरुषांचें' आहे, असें ठरतें.* यासंबंधीं प्रा. एस्. एस्. सूर्यनारायण शास्त्री यांनी आपलें मत पुढील शब्दांत व्यक्त केलें आहे:–"The सांख्य demonstration of a plurality of spirits applies properly to the materially constituted empirical selves, not to the pure unchanging 'Purusha.' The सांख्य arguments proceed on the varying incidence of birth and death, and the varying endowment of sense-organs etc. But birth and death do not happen to the 'Purusha' nor does the 'Purusha' have sense-organs. The varying occurances belong to different material collocations with which the 'Purusha' identifies himself, because he is reflected in the 'Buddhi' in each of these collocations. Each reflection constitutes a different empirical self; and the plurality of empirical selves (which is consistent with the existence of but one 'Purusha') is all that the सांख्य arguments require".[१७] याप्रमाणें 'ज्ञ' हें संसारातीत पुरुषाचें नांव असावयास पाहिजे व संसारी जीवांना 'पुरुष' किंवा 'लिङ्गपुरुष' असें नांव आहे. पण दोन्ही कल्पनांना एकच नांव दिल्यामुळे संशयास बळकटी आली आहे.

'ज्ञ' बद्दल स्पष्ट कल्पना येण्यासाठी 'लिङ्ग-पुरुषा' बद्दल विशेष विचार करावयास हवा. वर उध्दृत केलेल्या १८ व्या कारिकेंत लिङ्गपुरुष अनेक आहेत, असें सांगितलें असून जन्म, मरण, शरीर, क्रियाप्रवृत्ति, गुणांची विषम वाटणी–इत्यादि तें सिद्ध करण्यास कारणें दिलेलीं आहेत. लिङ्गपुरुषाच्या ठिकाणीं कर्तृत्व असलेंच

---

१४. कारिका १९.

१५. कारिका १८.

१६ कारिका १९ *Prof F.N.Mukerji–'The Theory of Reality' p. 61

१७ Intro. to his ed. of Sankby Karika p. XXIV fosot-note.

पाहिजे, नाही तर ' मी हें कार्य करीन, मी तें कार्य करीन ' —इत्यादि निश्चय कोणाचे ? या लिंगपुरुषाचें जें शरीर तें त्रिगुणात्मक अव्यक्ताचें एक व्यक्त स्वरूप. ' आपण सुखी, दु:खी ' असें त्याला वाटत असतें. कारिकांतील लिंगांच्या वर्णनावरून,[१८] लिंग हें व्यक्त, अविवेकि, त्रिगुणी, विषय, सामान्य, अचेतन आणि प्रसवधर्मि आहे, असें कळतें. बुद्धि, अहंकार, एकादश इंद्रियें, त्यांचीं तन्मात्रें यांपासून तें तयार झालेलें असतें. जेव्हा लिंगाचा चेतन पुरुषाशीं संबंध येतो, तेव्हा तें जणू कांही सचेतन होतें आणि कर्तृत्वादि गुण व्यक्त करूं लागते;[१९] परंतु ते सर्व गुण वस्तुत: मूल प्रकृतीचेच आहेत. या विवेचनावरून लिंगाचे (लिंगपुरुषाचे) गुण ज्ञ (ज्ञ पुरुषाच्या) पूर्ण विरुद्ध आहेत, असें आपल्या ध्यानांत येतें. तरी पण विशेष स्पष्टीकरणार्थ पुढील तुलना पहा:—

कांही दृष्ट्या असमाधानकारक आहे. ईश्वरकृष्ण जेव्हा ज्ञ आणि लिंग या दोहोंकरिता ' पुरुष ' असा एकच शब्द वापरतो, तेव्हा त्याच्या मतें लिंग हें ज्ञ चें प्रतीक आहे. त्यामुळें भेदज्ञानाच्या किंवा मोक्षाच्या वेळीं ज्ञमध्यें लिङ्ग लय पावतें, एवढ्या बाबतींत वाचस्पतीची लिंग शब्दाची व्युत्पत्ति ग्राह्य आहे; कारण लिंगाचें प्रतीकत्व भेदज्ञानापर्यंतच राहूं शकते. पण याहि पेक्षा विशेष समाधानकारक उपपत्ति उपलब्ध होऊं शकते. ' लिङ्ग्यते सूच्यते (ज्ञ:) येन तद् लिङ्गम्' अशी व्युत्पत्ति जर अंगिकारली, तर लिंगाचें तत्त्वज्ञान स्पष्टपणें उमगेल. कारण मग अव्यक्ताच्या प्रसवधर्मित्वामुळे ज्ञ ची जितकीं बुद्धींत प्रतिबिंबें पडतील, तितकीं लिंगप्रतीकें निर्माण होतील. चाळीसाव्या कारिकेवरून लिंगें म्हणजे जीवात्मेच होत, असें निश्चित दिसतें. सर्व विशेषांतून भ्रमण करणारें लिंग सृष्टींतील सर्व-पदार्थांत रहात असतें; प्रकृति आणि पुरुष यांच्या

ज्ञ (पुरुष)	लिङ्ग (पुरुष)
(१) कैवल्य	बहुत्व (का. १८)
(२) चैतन्य	अचेतन (का. २०)
(३) भावांनी अनधिवासित	भावांनी अधिवासित (का. ४०)
(४) माध्यस्थ्य, द्रष्टृत्व, अकर्तृभाव	दु:ख प्राप्त होतें (का. ५५)संसारांत पडतो (का. ४०)
(५) पुरुषाला अधिष्ठान मानून प्रधान स्वकार्यांत प्रवृत्त होतें (षष्टितंत्र)	लिंग निराश्रय राहूं शकत नाही. (का. ४१)
(६) मोक्ष प्राप्त करण्यास याचें ज्ञान आवश्यक.	मोक्ष दशेच्या पूर्वीच याची अवस्थिति.

या वरून लिंगपुरुषाची कल्पना जीवात्म्या-प्रमाणें व ज्ञ पुरुषाची कल्पना परमात्म्याप्रमाणें आहे, असें आपणास दिसून येतें. वाचस्पति ' लिंग ' शब्दाचा विग्रह ' लयं गच्छति इति ' असा करतो. ही उपपत्ति कांही दृष्ट्या बरोबर व सर्व भावांनी तें अधिवासित झालेलें असतें—प्रकृतीचे भाव हे क्षणिक असतात-जसे धर्माधर्मादि.

१८ कारिका—२०, ४०, ४१, ४२, ५२, ५५ इत्यादि. १९ कारिका २०

आणि, ज्याचे भाव नित्य असतात-जसे द्रष्ट्रत्व, कैवल्य, माध्यस्थ्य इत्यादि.

आता, असा प्रश्न उपस्थित होतो. ज्ञचें कैवल्य आणि लिंगांचें बहुत्व सत्य आहे काय ? तें एकाच वेळीं अनंत काळापर्यंत चालूं राहणार काय ? सांख्यांच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें दोन्हीहि सत्यच आहेत. मग ज्ञ आणि व्यक्ताव्यक्त यांतील भेदज्ञान कसें शक्य होईल ? जर ज्ञ आणि लिंगपुरुष एक नव्हेत, तर ज्ञ आणि व्यक्ताव्यक्त या दोहोंच्याहि भावांनी अधिवासित झालेल्या लिंगाला कोणत्याहि परिस्थितींत ज्ञ आणि व्यक्ताव्यक्त यांतील भेदाचें ज्ञान होणें शक्य नाही. यामुळे सांख्यांच्या तत्त्वज्ञानांत एक दुवा जोडण्याचा राहून गेलेला दिसतो; तो म्हणजे लिंगांचें बहुत्व भ्रममूल आहे, असें समजणें. अद्वैततत्त्वज्ञांनी हा दुवा आपल्या शास्त्रास जोडलेला आहे. जर लिंगपुरुषांचें बहुत्व भ्रममूल कल्पिलें, तर सत्य अशा भेदज्ञानानें तें नष्ट होईल व मग लिंगपुरुष, आपण स्वतंत्र अस्तित्व नसून 'ज्ञ'च आहोंत, असा निश्चित बोध करून घेईल. मग भेदज्ञान हें साक्षात् मोक्षाचें कारण न होतां 'आत्मज्ञान' हें ठरेल, कारण 'ज्ञ' हेंच परतत्त्व ठरेल–जसें अद्वैततत्त्वज्ञांनी 'परब्रह्म' मानलें आहे. कारण जर लिंगपुरुषाला 'मी ज्ञहून वेगळा नाही,' असें ज्ञान झालें, तर क्रमानें व निःसंशयपणें 'मी व्यक्ताव्यक्ताहून वेगळा आहे,' असें ज्ञान त्याला होईलच.

पुन्हा आणखी एक प्रश्न उपस्थित होतो. जर पुरुष (ज्ञ पुरुष) हा अकर्ता आहे, तर तो द्रष्टा कसा असूं शकेल ? पाहणें ही देखील एक क्रियाच आहे व जो ती (दृशिक्रिया) करतो, तो कर्ता होईल ! कारिकाकारानें पुरुषाचें द्रष्ट्रत्व अनेक कारिकांत सांगितलें आहे. 'द्रष्ट्रत्वमकर्तृभावश्च,'[20] 'पुरुषस्य दर्शनार्थम्,'[21] 'पुनर्नदर्शनमुपैति पुरुषस्य,'[22] 'प्रकृतिं पश्यति पुरुषः'[23] कारिकाकाराच्या लक्ष्यांत हा विरोध आला असेल किंवा नसेल, पण टीकाकारांची मात्र त्याचें मंडन करतांना तारांबळ उडालेली स्पष्ट दिसते. प्रा. मुकर्जी यांनी गौडपाद व वाचस्पति यांच्यांत 'पुरुषस्य दर्शनार्थम्'[24] यावर टीका करतांना झालेला मतभेद दर्शविला आहे आणि 'दर्शनार्थम्' याचा अर्थ 'स्वदर्शनार्थम्' असा करावा अशी सूचनाहि केलेली आहे.* परंतु या सूचनेनेहि मूळ दोषाचें निरसन होत नाही, हें स्पष्ट आहे.

" तदैक्षत बहु स्यां प्रजायेय,[25] " " स ईक्षत लोकान्नु सृजा[26] इति, " " स ईक्षांचक्रे, "[27] इत्यादि उपनिषद्वाक्यांत परब्रह्माची दृशिक्रिया कल्पिली आहे आणि शंकराचार्यांनी त्याची पटण्यासारखी उपपत्तीहि दिली आहे.[28] त्यावरून अद्वैत्यांच्या मतें परब्रह्माचें द्रष्ट्रत्व गौणवृत्तीनें मानलें आहे; आणि तें सुद्धा इंद्रियद्वारां संसारांत व्यवहार करणाऱ्यांच्या सोयी साठी. श्रुति देखील म्हणते–अपाणिपादो जवनो ग्रहीता

पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ।
सवेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता
तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम् ॥ (श्वेताश्वतर ३–१९)

ही उपपत्ति सांख्यतत्त्वज्ञानाला लागूं पडत नाही, म्हणून वर दर्शविलेल्या विरोधाचा परिहारहि होऊं शकत नाही. आणखी एक शंका या ठिकाणीं प्राप्त होते. विसाव्या कारिकेंत—

" तस्मात्तत्संयोगादचेतनं चेतनवदिव लिङ्गं ।
(गुणकर्तृत्वेच तथा कर्तेव भवत्युदासीनः)

अचेतन लिंग चेतन पुरुषाच्या संयोगानें चेतनाप्रमाणें आचरण करूं लागतें, असें सांगितलें आहे. आता, हा जो अचेतन लिंगाचा चेतन पुरुषाशीं संयोग होतो, तो समवाय-संबंध की, संयोग-संबंध ? पहिला असणें शक्य नाही, कारण घटांत रूप असतें, तसें अचेतन चेतनांत समवेत कसें असू शकेल ? दुसराहि असणें शक्य नाही, कारण तो सावयव वस्तूंतच संभवतो व पुरुष त्रिगुणविपरी[illegible]

---

२० कारिका १९. २२ कारिका ५९, ६[illegible]
२१ ,, २१. २३ ,, ६५.
२४ कारिका २४, २५ छांदोग्य. ६-२-३–
२६ ऐतरेय १-१-१, [27] प्रश्न ६-३; २८ शारीर
सूत्रभाष्य निर्णयसागर प्रत पा. २८.

* The Theory of Reality p. 6[illegible]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असल्यामुळे सावयव मानतां येत नाही. त्यामुळे चेतनपुरुष व अचेतनलिंग यांच्यांत कोणत्याच प्रकारचा संबंध अशक्य ठरत असल्यामुळे पुनरपि अद्वैत्यांची 'आत्मा बुद्धींत प्रतिबिंबित होतो' ही कल्पना ग्राह्य मानावी लागेल.

अशा रीतीने सांख्यशास्त्रांतील, ज्ञ, पुरुष, लिंग, प्रकृति —वगैरेंचा विचार केल्यावर असें वाटतें की, उपनिषदांतील कल्पनावरच सांख्यांनी आपल्या शास्त्राची उभारणी करण्याचा प्रथम प्रयत्न केला असावा. प्राचीन सांख्य हें मानीत नाहीत, पण नव्य सांख्यांनी मात्र कोठे कोठे आपल्या ग्रंथांतून उपनिषदांचे आधार उध्दृत केले आहेत. पण शंकराचार्यांसारख्या तत्त्वज्ञांनी उपनिषद् वाक्यांतून [२९] सांख्यांचा इष्टार्थ निघत नाही, हें ज्या अभिनिवेशाने सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे, यावरून त्यांतूनच सांख्यांना ईप्सित असा अर्थ निघत होता, निदान काढला जात होता, हें ध्वनित होतें. "The conception of spirit in the Sankhya is clearly nothing more than the carrying to a further limit of the conception of the self in the teaching of the Bruhadaranyaka Upanisad" याहि सामान्यमताचा उपन्यास 'ज्ञ'चा औपनिषद् परमात्म्याशीं असलेला संबंध लक्ष्यांत घेऊनच उपपन्न ठरेल.

मागील विवेचनावरून 'ज्ञ'ची कल्पना सांख्य शास्त्रांत फार सूक्ष्म झालेली आहे, हें आपल्या लक्ष्यांत येते. आणि, खरें पाहूं गेलें, तर सांख्य इतका विचारहि न करतां ज्ञ म्हणजे पुरुष एवढेंच समजतात. ज्ञ आणि पुरुष यांची जी तुलना आपण केली, तीवरून एक परमात्मा व दुसरा जीवात्मा एवढें खास मानावें लागतें व मग उपनिषदांतील पुढील श्लोक सुचल्यावाचून राहात नाही.

"द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषष्वजाते।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्ति अनश्नन्नन्योऽभिचाकशीति॥

ज्ञ आणि पुरुष यांना हें वर्णन योग्य लागूं पडतें. [३०]

परंतु साम्याबरोबरच 'ज्ञ' आणि परमात्मा किंवा परब्रह्म यांच्यांत बरेंच वैषम्यहि आहे. असें साम्य आणि वैषम्य एकाच वेळीं का असावें? याचें उत्तर म्हणून आम्हास असें वाटतें की, उपनिषदांतील कल्पनांवर सांख्य शास्त्राची प्रथम उभारणी होऊं लागल्यावर त्यांतील कांही कल्पना त्या शास्त्रतत्त्वांस जुळल्या व पुढें एकरूप होऊन वाढीस लागल्या व उलट कांही अर्धवटच राहून गेल्या. 'ज्ञ' ही अशीच एक सांख्यांतील अर्धवट औपनिषद् कल्पना आहे. तत्त्वास जुळली नाहीं, म्हणून, किंवा अन्य कारणाने सांख्यांनी ती अर्धवटच टाकून दिली. पण भारतीय तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकास मात्र 'ज्ञ' म्हणजे औपनिषद् परमात्मा व अद्वैत परब्रह्म यांमधील दुवा वाटतो.

---

२९ कठ-१-८-११; श्वेता. ४-५; बृहदा. ४-४-१७ इत्यादि.

(३०) श्वेताश्वतप–४–६
मुंडक–३–१–१

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कविता

म्हणा हिला ललिता कविता वा हृदयाची माया !
सहस्पंदनांतून निघाली शब्दांची दुनिया ! धृ०

बालपणीं हसतां-बागडतां
जें जें रंगित आलें हातां
कथा तयांच्या त्यांना पुसतां -
तेव्हा त्यांनी जें सांगितलें त्याच्या ह्या छाया ! १

पुढे कुणीतरि ह्या हृदयांतुन
मधून पाहे हलु डोकावुन
हालचाल ती टाकी मोहुन
स्वप्नाळू हा छंद लागला डोळे उघडाया ! २

जें जें भवतीं दिसलें अभिनव
त्यांची भरली उरांत जाणिव
–आणि कानिं ये उणिवांचा रव–
तडजोडीचे अंकुर वधती त्यांतुन उमलाया ! ३

पुढे जरा जातांना दिसले
विहंग वरवर गात चालले
ओळखिचे ते सूर वांटले
आणि लागलों मीहि तयांना साथ जरा द्याया ! ४

आणि इथे हा शांत जलाशय
जणु गत आयुष्याचा आशय
नित जो लावी आकाशीं लय
त्यामधि वरुनी पडून कांही जन्म मिळे वलयां ! ५

—अशोक

● ● ●

शेवटचें पान

मूळ लेखक : ओ. हेन्री
अनुवादक : मधुकर श्री. मंगरूळकर,
बी. ए., एल् एल्. बी.

● विख्यात लघुकथा लेखक ओ. हेन्री यांच्या ' The last leaf ' या उत्कृष्ट लघुकथेचा नागपूरचे रा. मधुकर श्री. मंगरूळकर यांनी सुरेख अनुवाद केला आहे.

★ ★ ★

वॉशिंग्टन स्क्वेअर मधले ते रस्ते मोठे तऱ्हेवाईक होते. उन्मत्तासारखे वाकडे तिकडे पसरलेले. कांही रस्ते वळणं घेऊन पुन्हा स्वत:लाच येऊन मिळत, किंवा स्वत:चे लहान लहान तुकडे पाडून घेत. तिथे 'आर्टिस्ट' लोकांची वसति होती. त्यांच्यापासून रंगाचं आणि कॅनव्हासचं बिल वसूल करायला गेलेला माणूस, एक पैचीहि प्राप्ती न होतां, पुन्हा त्याच जागीं परत यावा, अशी त्या रस्त्यांची रचना—!

साहजिकच या टुमदार गावांत कलावंत मंडळींची आवक वाढली होती. नयनदीपक सृष्टिसौंदर्य आणि स्वस्त भाड्यानं मिळणाऱ्या खोल्या ! मग वसति वाढायला काय हरकत होती ?

अशा एका रस्त्याच्या बाजूला जॉन्सी आणि स्यू या दोघींनी चित्राचा स्टुडिओ स्थापिला होता. जॉन्सीचं खरं नाव होतं 'जॉन्ना', पण लाडकं नाव म्हणून 'जॉन्सी'च ज्याच्या त्याच्या तोंडी झालं होतं. ती आली होती 'मेन' गांवाहुन अन् स्यू होती कॅलिफोर्नियाची. एका चमत्कारिक प्रसंगानं त्या एकमेकींजवळ आल्या आणि ऋणानुबंधी बनल्या. एका इंग्लिश खाणावळींत त्या सहज एका टेबलावर बसलेल्या आड-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ळल्या. गोष्टीनं गोष्टी वाढल्या, त्यांच्या आवडी, ब्लाऊझच्या फॅशनबद्दलची मतं एकमेकींशीं जुळत होतीं. त्या 'भोजन भगिनीं'ची एकमेकींबद्दलची आस्था वाढली आणि त्या मैत्रीचें परिणित स्वरूप म्हणजे त्यांचा तो स्टुडिओ.

नोव्हेंबर महिन्यातली गोष्ट. एका अनोळखी पाहुण्याचं आगमन या वस्तींत झालं होतं. तो आपल्या बर्फासारख्या थंडगार बोटांनी यमपाश सहज या घरावर, त्या घरावर-टाकूं लागला! घराघरावर प्रेतकळा पसरूं लागली! गावांत तर या पाहुण्यानं आपल्या टांचेखाली किती तरी जीव चिरडले. पण या कलावंताच्या वस्तींत तो आस्ते क़दम येत होता.

डॉक्टरांनी या पाहुण्याचं नामकरण केलं 'न्युमोनिया' !!

कॅलिफोर्नियाच्या मस्त हवेनं जिचं रक्त पोसलं होतं, अशा स्यूवर त्याचा हात पडणं कठीण होतं, पण बिचारी जॉन्सी! तिला मात्र त्यानं तडाखा दिला. रंगीत पलंगावर अंथरुण पसरल्या गेलं. त्यावर जॉन्सी निजली. समोरच्या खिडकीच्या डच कांचेच्या तावदानांतून पलीकडे दिसणाऱ्या घराकडे नजर लावायची हेंच तिचं काम, हाच तिचा विरंगुळा—!

एक दिवस डॉक्टर स्यूला बाहेर दिवाण-खान्यांत घेऊन आले नि म्हणाले,

'असं पहा! प्रयत्नाची शिकस्त तर आपण करूंच. पण आशा जरा कमीच. रुपयांत एक आणा समजा—'

हातांतलं थर्मामिटर झटकत ते म्हणाले

'—आणि या स्त्रीची जगण्याची इच्छा तीव्र असेल, तरच एक आणा आशा आहे हं! इथं पहावं, तर लोक तिच्या पलंगाभोंवती उभं राहून असा कांही चेहरा करतात की—आम्हा वैद्यकीय लोकांना शरम वाटायला लागते—आणि तुमच्या या धाकट्या बाईनी आपण आता जगत नाही, अशी धास्ती का घेतली आहे, कुणास ठाऊक! कांही मनावर दडपण आहे का तिच्या?'

'तसं तर कांही नसावं— आयुष्यांत फक्त एकदा तरी नेपल्सच्या खाडीचं सुंदर चित्र रंगवीन ही इच्छा आहे तिची अतृप्त. मग तर कांही आठवत नाही मला—' '-चित्र! छे हो! इतकं क्षुल्लक नाही. माझी कल्पना आहे, ती गोष्ट तिच्या मनांत सारखी घोळत असावी. एक विचारूं तुम्हाला?... कुणाच्या प्रेमांत वगैरे तर पडली नाही ना' 'प्रेमांत--?' - छद्मी हास्य करून स्यू म्हणाली, 'पुरुषाजवळ प्रेमांत पाडण्या-सारखं—पण जाऊं दे डॉक्टर! तुम्ही म्हणतां त्यांतलं कांही नाही, हं! त्याबद्दल मी खात्री देतें —'

—'मग हा मनाचा कमकुवतपणा समजावा, आणखी काय? माझं वैद्यकीय कसब पणाला लावून मला जें करतां येण्यासारखं आहे, तें मी करीन. पण, आपल्या प्रेतयात्रेला कोण कोण मंडळी येणार, किती गाड्या येतील, याचा विचार जर रोगी आपल्या मनाशी करीत बसला तर औषधीचा गुण पन्नास टक्के कमी होतो, असं समजण्याला हरकत नाही...तिचं मन दुसरीकडे गुंतवलं पाहिजे. असं करा : येत्या हिंवाळ्यांत घालायच्या पोलक्याच्या बाह्यांच्या तऱ्हा कशा राहतील, हें तिला विचारा. म्हणजे तेवढाच विसर पडेल तिला.'

डॉक्टर गेल्यावर स्यू आपल्या खोलींत जाऊन खूप रडली. हातांतला जपानी हातरुमाल ओलाचिंब होतपर्यंत आसवं ढाळलीं. मग जणु कांहीच झालं नाहीं असा आविर्भाव करून रंग-फलक हातांत घेऊन व तोंडानें शीळ घालीत कुठल्याशा रागाचे स्वर आळवीत ती जॉन्सीच्या खोलींत आली. जॉन्सी निजलेली पाहून तिनं शीळ थांबवली व रंगफलक नीट ठेवायला सुरवात केली. तिला रेखाचित्र पूर्ण करायचं होतं. एका डोळ्याला चष्मा लावलेल्या व अबलख वारूवर स्वार झालेल्या 'इडॉव्हो'च्या गुराख्याचं चित्र आजच्या आज तयार करून मासिकाकडे पाठ-वायचं. त्या चित्रासाठी कदाचित् गोष्ट अडली असेल.....

चित्र हळूहळू तयार होत होतं. स्यूला खालच्या आवाजांत उच्चारलेले शब्द ऐकूं आले. हातांतलं काम बाजूला करून ती जॉन्सीच्या पलंगाजवळ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गेली. तिचे डोळे सताड उघडे होते. तोंडाने अंक उलट्या क्रमांत मोजणें चाललें होतें. 'बारा… अकरा…दहा…नऊ'

स्यूनं तिच्या नजरेवरून बाहेरचा वेध घेतला. पण तिला असं उलटं मोजण्यासारखं त्या खिडकींतून कांहीं दिसतं नाहीं. एक जुनाट कवलारू घर, उजाड अंगण आणि त्या घराच्या साहाय्यानं कशीवशी वर चढलेली वेली… तीहि गलितपर्ण झाली होती. शिशिराच्या एका जोरदार थंड निःश्वासानं तिची बरीचशी पानं हिरावून घेतली होतीं. निव्वळ सांगाडा उभा होता. आता- या दृश्यांत पहाण्यासारखं काय आहे, हें स्यूला कळेना!…ती जॉन्सीला म्हणाली;

'काय झालं,' बेटा—?

'सहा' ती कुजबुजत म्हणाली, किती भराभर गळताहेत! तीन दिवसांपूर्वी शंभरापेक्षा जास्त होतीं. मोजतां मोजतां माझ्या डोळ्याला कळ लागली… तें पहा…आणखी एक गळालं…फक्त पाचच राहिलींत आता…

'काय, म्हणतेस काय? पाच काय-? तुझ्या लाडक्या स्यूला नाही का सांगायचं?

'अग पानं! त्या वेलीच्या पानांबद्दल म्हणतें मी. तें शेवटचं पान गळलं की…मी देखील गळून पडणार. गेल्या तीन दिवसांपासून मला भविष्य माहित आहे. तुला डॉक्टरनं सारं सांगितलं ना'?

'कांहीं तरी मूर्खासारखं बडबडते आहेस, झालं. तुझ्या प्रकृतीशी अन् या वेलीशी अर्थाअर्थी तरी संबंध कांहीं? वेड्यासारखं कांहीं तरीच बोलायचं म्हणजे काय? डॉक्टर तर म्हणाले, तुझी तब्बत किती भराभर सुधरते आहे म्हणून-हं! आतां ही खीर खा जरा. तुझ्या स्यूला काम करूं दे जरा. त्याचे पैसे आले म्हणजे या माझ्या पिलासाठीं ब्रॅन्डी आणतां येईल, माझ्यासाठी--'

'अहं! ब्रॅन्डी वगैरे आणायच्या भानगडींत तूं पडूं नयेस, हें उत्तम,' जॉन्सी म्हणाली. तिचे डोळे अजूनहि बाहेरच रोखले होते. ती म्हणाली,

'तें पहा आणखी एक पान गळालं. आता चारच राहिली. एकेक पान माझ्या डोळ्यासमोर गळून पडावं, ही माझी इच्छा… … नको ग नको…मला खीर नको, कांही नको. कशा-कश्यावर माझी वासना उरली नाही. फक्त अंधार पडण्यापूर्वी तें पान गळलेलं या डोळ्यांनी पहावं, ही इच्छा आहे-मग आम्ही जाऊं आपल्या गावा! …'

स्यूला ते सहन झालं नाही. ती तिच्याजवळ जाऊन म्हणाली, 'जॉनी, लाडके, असं काय बरं करतेस लहान मुलासारखं? लाव डोळे. माझं काम होईपर्यंत खिडकीबाहेर पहाणार नाही, अशी शपथ घे बरं. चित्राला उजेड हवा, नाही तर ही खिडकीच मी बंद करून टाकली असती—'

'बाजूच्या खोलींत काढ की चित्र—'

'तें कांही नाही. मला तुझ्या जवळ बसूनच चित्र काढायचें आहे. वेलीकडे मी तुला नाही पाहूं देणार……'

'तुझं झालं म्हणजे सांग बरं…कारण मला तें पान पहायचं आहे—' जॉनी म्हणाली. तिने आपले डोळे मिटले. ती एखाद्या पांढऱ्या पुतळ्या-सारखी दिसत होती. ती आता स्वतःशीच बोलत होती— 'कारण आता मला विचार करावयाचा कंटाळा आला आहे. मला मुक्त व्हावसं वाटतं…वाटतं, बेबंद व्हावं…सगळीं बंधनं तोडून टाकावीत…अन् त्या बिचाऱ्या पानासारखं तरंगत कुठे तरी…खोऽल खोऽल…'

'पुरें, झोप बरं आता. मी बेहरमनला 'पोझ' देण्यासाठी बोलावून आणते. डोळे उघडायचे नाहीत, बरे आलेंच हं—'

म्हातारा बेहरमन त्यांच्या खाली रहात असे. तोहि चित्रकार होता. त्याची साठी उलटली होती. मायकेल अँजेलोच्या 'मोझेस्' सारखी त्याची लांब दाढी होती. एकदा तरी 'मास्टर पीस' चित्र काढायचं ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. पण त्या चित्रास सुरवात होत नव्हती. चाळीस वर्षे कुंचला वापरूनहि तो अयशस्वी राहिला होता. होतकरू चित्रकारापुढे मॉडेल म्हणून बसावे अन् कमाईतून आकंठ दारू पिऊन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या ‘ त्या ’ चित्राचं वर्णन बडबडत असावं, हा त्याचा कार्यक्रम. या दोन तरुण पोरींच्या रक्षणाची काळजी आपल्यालाच आहे, अशी त्याची नेहमीची वागणूक.

स्यू त्याच्या खोलींत आली, तेव्हा कुठल्याशा फळांचा तो वास घेत होता. मंद प्रकाश सर्वत्र पसरला होता. पलीकडच्या कोपऱ्यांत गेलीं पंचेवीस वर्षं ‘ त्या ’ सर्वोत्कृष्ट चित्राचें चित्रण होण्याची वाट पहात एक कोरा चित्रफलक उभा होता.

तिनं त्याला सारं सांगितलं, ती दगावण्याची देखील भीति आहे, हेंहि सांगून टाकलं. म्हातारा बेहरमन त्या मूर्खपणाला पाहून रागानं ओरडलाच, काय मूर्ख कारटी आहे ही ! वेलीचं पान गळून पडल्यानं म्हणे मरण येणार आहे ! यापेक्षा मूर्खपणाची सीमा आणखी कोणती ?···आज मॅाडेल –बिडेल कुछ नहीं···पण तूं तिच्या डोक्यांत हें वेड कसं घुसूं दिलंस ? ”

—‘ अहो ! मी तरी काय करणार ! तापानं ती अशक्त झाली आहे. मनांत काय काय चितं फिरतात तिच्या, हें मला तरी बाई कसं कळणार ? आतां तुम्हाला पोझ् द्यायची नसेल, तर नका देऊं बापडे– राहिलं माझं चित्र तसंच—’

—‘ अग, नाही कुठें म्हटलं ! अगदीच पोर आहेस तूं. चल, येतो तुझ्या बरोबर–पण जॉन्सीला मरून कसं चालेल ! एक दिवस मी एक मस्त चित्र काढीन अन् मग जाऊं आपण सगळे. हं ! चल—’

ते वर गेले, तेव्हा जॉन्सी झोपी गेली होती. स्यूनं खिडकीवरचा पडदा सोडला आणि बाजूच्या खोलींत चित्रफलक लावला. न कळत त्यांच्या नजरा त्या वेलीकडे जात. एकमेकांच्या अर्थपूर्ण नजरा एकमेकांकडे पहात. बाहेर बर्फ व पाऊस पडत होता. बेहरमन पोझ् घेऊन बसला.

एक तास झोप घेऊन स्यू सकाळी उठली, तेव्हा ज्यॉन्सीकडे तिनं पाह्यलं. मंद डोळ्यांनी ती एकसारखी त्या खिडकीकडे पहात होती. ती हळूच म्हणाली, ‘ उघड ती खिडकी. पाहूं दे एकदा मला तें पान ’— स्यू न उघडून सांगते कुणाला ? तिनं थरथरत्या हातानं फळ्या विलग केल्या. हळूहळू खिडकी पूर्ण उघडली, अन् काय आश्चर्य—!

रात्रभर धो धो कोसळणाऱ्या पावसाला व वादळाला दाद न देतां एकच पान त्या वेलीला चिकटून उरलं होतं ! देठाजवळ हिरवं कंच पण टोकाजवळ पिवळं···फिक्कट···! अजूनहि जमिनीपासून वीस फुटांवर दिमाखानं मिरवत होतं !

—शेवटचं पान—‘ जॉन्सी म्हणाली, ’ मला वाटलं, रात्रीं तें जरूर गळेल···रात्रभर सूं सूं वारा मला ऐकूं येत होता. हरकत नाही. आज पडेल अन् त्याच वेळेस आमचा खेळ खतम होईल ......

‘ तूं असं म्हणूं लागलीस, तर माझं कसं ग होणार ? माझ्यासाठी तरी...... ’ स्यूचा गळा भरून आला होता.

ती कांही बोलली नाही. त्या शेवटच्या प्रवासासाठी ती तयारी करीत होती. तिच्या मैत्रीची, भौतिक जगाचीं बंधनं जसजशीं सैल होत गेलीं, तसतशीं तिची खात्री झाली ! मृत्यूच्या कल्पनेचा तिच्यावर पूर्ण पगडा बसला होता !

तो दिवस गेला. संध्याकाळच्या मंद प्रकाशांतहि तें पान दिसत होतं तसंच फांदीला चिकटून असलेलं ... रात्रीबरोबरच उत्तरेकडील वाऱ्यांना हुडहुडी भरली. खिडक्या रात्रभर वाजत होत्या. बाहेर रात्रभर मुसळधार पाऊस पडला.

झुंझुरका थोडासा प्रकाश झाल्याबरोबर त्या निष्ठुर जॉन्सीनं स्यूला खिडकी उघडण्याची आज्ञा फरमावली.

—तें पान तसंच होतं ! तसंच चिकटून ! !

जॉन्सी पुष्कळ वेळ तिकडे पहात होती. गॅस स्टोव्हवर स्यू खीर करीत होती. तिला हाक मारून ती म्हणाली,

‘ लाडके स्यू , !“ किती ग वाईट आहे मी ! किती त्रास दिला तुला मी ! जणु माझा दुष्टपणा दिसावा, म्हणूनच तें पान तिथं राह्यलं... मरणाची इच्छा करणं म्हणजे पाप करणं आहे, हें आता मला कळलं. आण जा ! खीर आण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थोडी. खाऊं दे मला. मला जगायचं आहे. अन् ऐकलंस का ? –दुधांत थोडी पोर्टवाईन टाकून आण ... आणि ... नकोच पण... आधी आरसा आण. मला उशा टेकवून उठवून बसव, म्हणजे स्वयंपाक करतांना तूं मला दिसशील ...'

—आणखी एक तासानंतर —

' स्यू ! आपलं तें नेपल्सच्या खाडीचं चित्र रंगवायच राह्यलंच आहे, बरं का '

दुपारी डॉक्टर आले. कांही तरी निमित्त काढून स्यू त्यांच्या मागोमाग गेली. डॉक्टरनं हस्तांदोलन करीत म्हटलं,

' —पुष्कळ आशा आहे हं आता ! नीट शुश्रूषा करा की, जिंकली. मला खालच्या पेशंटला भेटायचं आहे. तो म्हातारा बेहरमन.... आर्टिस्ट होता वाटतं तोहि... न्युमोनिया, आणखी काय ?... कठीण आहे ! दवाखान्यांत जाईल, तर शेवटी थोडा तरी आराम मिळेल बिचाऱ्याला—'

दुसऱ्या दिवशीं ती संकटांतून पार पडली, असं डॉक्टरनी स्यूला सांगितलं. ' आता खाण्याला जपा आणि शुश्रूषा ...... की बस '

दुपारी स्यू जॉन्सीच्या अंथरुणावर येऊन बसली. निजल्या निजल्या ती निळ्या लोकरीचा गळपट्टा विणत होती. स्यूनं आपला हात तिच्या गळ्याभोवती घालून म्हटलं,

' माझ्या सशा ! तुला एक गोष्ट सांगायची आहे. म्हातारा बेहरमन न्युमोनियानं वारला ! दोन दिवस फार आजारी होता बिचारा !... परवाच्या दिवशीं तर तो पायऱ्यांशी गोठून पडलेला कुणालासा आढळला ! त्याचे जोडे आणि कपडे भिजून चिंब झाले होते नि बर्फानी गोठून गेले होते ! एवढ्या वादळ्या रात्रीं तो कुठं गेला असावा, याची कांही कुणाला कल्पना येत नाही !... मग त्यांना एक पेटलेला हातकंदील आढळला. आपल्या ठिकाणावरून काढून नेलेली शिडी आढळली. रंगाचे कुंचले आणि रंगाच्या फळीवर पिवळा व हिरवा रंग यांचे मिश्रण आणि—'

' लाडके, पहा, बाहेर पहा. त्या एकुलत्या एका पानाकडे पहा. इतका सोसाट्याचा वारा वाहिला, तरी तें पान गळून का पडलं नाही, याचं तुला आश्चर्य नाहीं वाटत ? तें हलत नाही–डोलत नाही. का ?–अग वेडे ! तें आपल्या बेहरमनचं ' मास्टरपीस ' चित्र आहे. ज्या रात्रीं तें शेवटचं पान गळून पडलं, त्याच रात्रीं त्यानं तें पान रंगवून झाडावर टोचून ठेवलं... '

• • •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कोल्हटकरांच्या नाटकांचें रंगभूमीवरील यशापयश

द. रा. गोमकाळे,
एम्. ए., एल् एल्. बी.

● नाट्यप्रेमी साहित्यिक रा. गोमकाळे यांनी प्रस्तुत लेखांत कै. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकांच्या रंगभूमीवरील यशापयशाची मार्मिक चर्चा केली आहे.

★ ★ ★

कै. श्री. कृ. कोल्हटकर यांचीं पहिलीं पाच नाटकें मराठी रंगभूमीवरील अग्रगण्य अशा किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीने रंगभूमीवर आणलीं आहेत. त्यांच्या पहिल्या नाटकांत नायकाचें काम प्रसिद्ध संगीत नटवर्य भाऊराव कोल्हटकर यांनी केलें. दुसऱ्या 'मूकनायकां'तील नायिकेचें काम बालगंधर्वांनी—प्रथम कांही दिवस किर्लोस्कर नाटक मंडळींत असतां व नंतर गंधर्व नाटक मंडळींत— केलें. 'मतिविकार,' 'प्रेमशोधन' या दोन्हीं नाटकांत बालगंधर्वांनी अगदी सुरुवातीपासून प्रमुख भूमिका केल्या. 'मूकनायका' पासून 'प्रेमशोधना'पर्यंत नायकाच्या भूमिका कै. जोगळेकर यांनी केल्या. नटवर्य बोडसांनी 'वीरतनयां'त मालिनीची भूमिका केली असली, तरी 'मूकनायक', 'गुप्तमंजूष', 'मतिविकार' आणि 'प्रेमशोधन' या नाटकांत अनुक्रमें प्रवाद, शृंगी, विहार आणि कंदन अशा अगदी वेगवेगळ्या प्रकारच्या या त्यांच्या भूमिका त्यावेळीं अत्यंत लोकप्रिय झाल्या. स्वत: बोडसांनी देखील 'मूकनायक' आणि 'प्रेमशोधन' हीं आपलीं आवडीचीं नाटकें असून कोल्हटकरांच्या नाटकांमुळे नाट्याला भरपूर अवसर व आपल्याला विस्तृत असें कार्यक्षेत्र लाभलें, असा आपला अभिप्राय १९४० सालीं नाशिक येथील नाट्य-संमेलन—प्रसंगीं प्रस्तुत लेखकाजवळ व्यक्त केला. सारांश, कोल्हटकरांच्या पहिल्या पाच नाट्य-कृतींना नट चांगले लाभले, यांत शंका नाही. असें असतांहि 'मूकनायका'चें उदाहरण वगळल्यास हीं नाटकें कोल्हटकरांच्या हयातींतच मागे का पडलीं ? या पहिल्या पाच नाटकांपैकी 'प्रेमशोधन' मात्र ललितकलादर्श-नाटक-मंडळीने १९३४ सालीं पुन: रंगभूमीवर आणलें.

त्या वेळचा आपण रंगभूमीचा इतिहास पाहिला, तर 'वीरतनया'च्या प्रयोगाच्या वेळीं आणि 'मूकनायक' रंगभूमीवर येण्यापूर्वी कोल्हटकरांना किर्लोस्कर मंडळीने कांहींसें चाळविलें. पहिल्या वेळीं देवलांच्या रोषाचें कारण होतें, असें सांगतात, तर दुसऱ्या -(म्हणजे 'मूकनायका'च्या) वेळीं स्वत: कोल्हटकरांनीच कै. मुजुमदार यांच्या एका पत्राचा उल्लेख केला आहे. 'मुदतीचें मुळींच कारण नाहीं, नाटक आम्ही बसवावयास घेणार, याबद्दल शंकाच नको'—असें सांगूनहि नाटक लेखनाच्या दृष्टीने चांगलें झालें आहे, पण रंगभूमीच्या दृष्टीने तें कसें वठेल'—याची मुजुमदारांना शंका असल्याचें मागाहून मुजुमदारांनी कळविलें. शेवटीं तेंहि नाटक किर्लोस्कर–नाटक–मंडळीने रंगभूमीवर आणलें. तेव्हापासून 'प्रेमशोधन' नाटक रंगभूमीवर येईपर्यंत कोल्हटकर, किर्लोस्कर–नाटकमंडळीचे प्रमुख नाटककार बनले; आणि त्यानंतर खाडीलकरांचें 'मानापमान' किर्लोस्कर नाटकमंडळीने रंगभूमीवर आणलें. तोंपर्यंत कोल्हटकर आणि मुजुमदार यांचे संबंध प्रेमाचेच होते. कोल्हटकरांच्या नाटकांचा इतिहास ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला आणि ज्याला त्या सर्व प्रयोगांची अंतर्बाह्य इतिहासाची प्रत्यक्ष माहिती आहे, अशा व्यक्तींत मुजुमदार प्रमुख आहेत. कोल्हटकर आणि किर्लोस्कर-नाटक-मंडळी यांचे संबंध १९१० सालापासून दुरावले. त्यानंतर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१७ वर्षांनी कै. मुजूमदार यांनी कोल्हटकरांचें चरित्र लिहिलें. हें चरित्र त्यांनी व्यक्ति दृष्ट्या कोल्हटकरांची विशेष माहिती देण्याचा प्रयत्न न करितां नाटककार या दृष्टीनेच तें लिहिलें आहे. या चरित्राचा हवाला देण्याचें आणखी कारण असें आहे कीं, कोल्हटकर मुजुमदारांच्या लोभाचे तसेंच रागाचेहि धनी होते व अशा व्यक्तीने परस्परांचे संबंध तुटल्यानंतर १७ वर्षांनी चरित्र लिहिलें, त्यामुळे त्यांत दिलेला इतिहास हा बराच निर्दोष, निर्लेप आणि वस्तुस्थितीचा निदर्शक असण्याची संभवनीयता अधिक आहे.

ते म्हणतात–‘ कोल्हटकरांची योग्यता न कळण्याला आरंभीं मत्सर कारणीभूत झाला. याचें कारण किर्लोस्करमंडळी त्यांचीच नाटकें सुमारें १५ वर्षे रंगभूमीवर करीत असे. त्यामुळे इतर नाटककारांना आपलीं नाटकें किर्लोस्कर मंडळीकडून रंगभूमीवर आणण्यास शिरकाव मिळाला नाही, हें एक कारण कोल्हटकरांविषयीं कित्येकांचा मत्सर जागृत होण्याला झालें होतें; व कोल्हटकरांबरोबर किर्लोस्कर-मंडळीवरहि टीकांचे हल्ले होत असत! कोल्हटकरांच्या नाटकांवर अनुकूलपेक्षा प्रतिकूल टीकांचाच भडीमार वर्तमानपत्रांतून होत असे व ‘ नाट्यकलारूक्कुठारा ’ ची कडवट मात्रा ही त्या अनेक टीकांपैकीं एक आहे, हें आपण नाटकांचें परीक्षण करतांना पाहिलें आहेच. अर्थात् लोकमत आधी तयार करण्याचीं जीं साधनें उपलब्ध आहेत, त्यांचा उपयोग कोणत्याहि नाटकाची प्रयोगक्षमता पडताळून पाहण्यापूर्वीच कसा केला जातो व प्रयोगक्षमता सिद्ध करण्याची न्याय्य अशी संधीहि कांही नाटकांना कशी मिळत नाही, हें येथे दाखविण्याचा आमचा हेतु आहे.

कोल्हटकरांनी प्रेक्षकांचा तरी अनुनय केला का? कोल्हटकरांचे टीका लेख वाचावे म्हणजे ‘ नाट्यकलारूक्कुठारां ’ तील आचरट विडंबनापेक्षाहि ते अतिशय तीक्ष्ण आहेत, असें दिसून येईल. नाटकाचें वातावरण तरी बहुजनसमाजाला रुचेल, पटेल, आवडेल असें आहे का? नाटक पाहावें तर पूर्ण स्वतंत्र अशा विचारसरणीचें– नाटकांतील स्त्री–पुरुषांची वागणूक पूर्णतः आधुनिक विचारसरणीची, चालू प्रकारांना फाटा दिलेला. भाषा तरी बहुजनसमाजाची आहे का? तेंहि नाही. भाषा अत्यंत कोटीबाज, पण सामान्यत्वें करून बहुजनसमाजाला त्यांतील खाचाखोचा सहजासहजीं न कळण्याइतकी वरच्या दर्जाची. प्रसंग तरी मडक आहेत का? तेंहि प्रामुख्याने आंतरिक कलहाचे. विरोध हा बहुशः व्यक्ति-व्यक्तीच्या विचारांत वा एकाच व्यक्तीच्या स्वतःच्याच अंतःकरणांतील दोन विरुद्ध विचारांत. कलह असावयाचे ते देखील प्रेमासाठी. प्रेमासाठी अनेक लढाया झाल्याचे इतिहास सांगतो. पण, प्रेमासाठीं लढाई करावी लागली, अशीं फारशीं उदाहरणें कोल्हटकरांच्या नाटकांत नाहीत. धैर्याचा मेरू असा वीर सिंहकंदन– कोल्हटकरांनी गाईपेक्षाहि गरीब करून सोडला. नाव मात्र विक्रांत, पण पराक्रम सारा प्रेमाचें हृदय मिळविण्याकरिता निरनिराळीं सोंगें नटविण्यापुरता. आपल्याला पाहिजे ती पत्नी मिळविण्याकरिता वीरसेन प्रकोपाच्या नगरीवर चाल करून येतो. पण प्रत्यक्ष पाहावें, तर नोकर आणि मालक या दोघांनीहि प्रत्यक्ष लढाई शिवायच—(किंवा फारच थोड्या लढाईवरच) ध्येय–प्राप्ति करून घेतलेली. ‘ वधूपरीक्षे ’ तील नायकहि तसाच. सारांश, नाटकांतील प्रसंग हे केवळ बुद्धिगम्य अशा संग्रामाचे. त्यांत तरी कोणत्या उदात्त ध्येयाचें दर्शन घडतें का? नाही. व्यक्तिसुखाचाच वास त्यांत अधिक यावयाचा. नायक–नायिकेमुळें कोणताहि उच्च आदर्श आढळण्यापेक्षा स्वतःच्या सुखाचा विचारच अधिक प्रभावी. अशा तऱ्हेच्या प्रसंगांत नाट्य, उत्कट प्रसंग व भावनोत्कटता कशी आणि किती आढळावयाची? भावनोत्कटता आणि नाट्यच जर नाटकांत नसेल, तर बहुजनसमाजाला तीं आवडावीं तरी कशीं?

कोल्हटकरांच्या नाटकांत वैचारिक संग्राम आहे, नाही असें नाही. आपण ‘ मतिविकारा ’ चेंच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उदाहरण घेऊं. त्यांतील सरस्वतीची मानसिक अवस्था–मनोहराचे उदात्त विचार व आदर्श शील यामध्यें व्यक्त झालेला संग्राम हा मनोज्ञ नाहीं, असें कोण म्हणेल ? सरस्वतीचें स्वतःच्या आचरणाचें समर्थन इतकें जोमाचें, त्वेषाचें आणि कळकळीचें आहे की, त्या दोघांच्या भाषणांतून व्यक्त होणारी त्यांची मनःस्थिति कोणालाहि आकृष्ट करून घेईल. पण या प्रसंगांत नाट्य किती आहे ? केवळ चुरचुरीत व अवीट अशा संभाषणांनीहि कांहीं काल नाटकें यशस्वी होऊं शकतील. तीं संभाषणें माणसाला कांहींशी विचारप्रवृत्तहि करूं शकतील. परंतु त्याचें स्वरूप सामान्यतः विनोदी व उथळच राहील. अंतःकरणांतील त्वेष, अन्यायाची जाणीव व त्यांचा विरोध करूं पाहणारी मनोवृत्ति यांचें पोषण अशा उथळ संभाषणांनीं होणेंच शक्य नाहीं. मतिविकारां'तील नटवर्य बालगंधर्व यांची सरस्वतीची भूमिका आणि नटवर्य बोडस यांची विहाराची भूमिका या दोन्हींहि भूमिका अतिशय प्रसिद्ध आहेत. वरेरकरांनी तर बालगंधर्वांच्या सरस्वतीच्या भूमिकेचें अतिशय चांगलें वर्णन केलें आहे; व त्यानंतर इतकी त्यांची नैसर्गिक व उत्कृष्ट भूमिका त्यांना कधीहि पाहावयास मिळाली नाहीं, असेहि ते सांगतात. बालगंधर्वांच्या 'एक खांबी' प्रयोगांवर गंधर्व-नाटक-मंडळीने खोऱ्यानें पैसा ओढला, ही वस्तुस्थिति अगदीं ताजी आहे. त्याच नटवर्यांची इतकी उत्कृष्ट भूमिका वठत असतां व विहाराची बोडसांची भूमिकाहि तितकीच उत्कृष्ट वठत असतांहि 'मतिविकार' कां मागे पडलें ? याचें कारण त्या नाटकांतील उत्कट प्रसंगांचा अभाव. बहुजन समाजाचें लक्ष्य व्यवहारांतून काढून आपल्याकडे आकृष्ट करून घेईल, असा एकहि प्रसंग 'मतिविकारांत' नाहीं. विहाराच्या स्वभावांत परिवर्तन घडून आल्यानंतर जे जे प्रसंग घडले आहेत, ते कोणालाहि पटत नाहीत आणि 'Make believe' खरें नसूनहि खरें वाटण्याइतका बेमालूम आभास निर्माण करण्याचें कार्य अशा घटना करूं शकत नाहींत.प्रेक्षकांना आकर्षित करून घेण्याचा सामान्य व सुलभ राजमार्ग म्हणजे प्रेक्षकांना नाटकांतील व्यक्तींच्या सुखदुःखांबद्दल सहानुभूति वाटेल अशा प्रकारें त्या व्यक्तींचें चित्रण करणें हा होय. हें कार्य त्या व्यक्तींबद्दल प्रेक्षकांना जिव्हाळा व सहानुभूति वाटली, तरच होऊं शकेल. मनोहराचें एक अपवादात्मक उदाहरण वगळल्यास 'मतिविकारां' तील अन्य कोणत्याहि व्यक्तीबद्दल आत्मीयता व सहानुभूति वाटत नाहीं.

सुरुवातीला आपण पाहिल्याप्रमाणे 'काय सांगितले' यापेक्षा 'किती उठावदारपणें जें सांगावयाचें तें सांगितलें' यावरहि प्रयोगक्षमता अवलंबून असते. या दृष्टीने विचार केला असतां 'मतिविकार' नाटकाच्या परीक्षणांत देखील पुनर्विवाह हा प्रतिपादित विषय त्यांत असला, तरी कथानकाची गति त्याच एका साध्याच्या दृष्टीने केंद्रित झालेली नाहीं. नाटकांतील कथानकाचें वर्णन करतांना 'Story deliberately, logically and dramatically told' असें वर्णन करतात. इब्सेनच्या नाटकाचा विचार करतांनाहि आपण त्याचीं कथानकें वरील सूत्रानुसार गुंफलेलीं असल्यामुळे तीं उठावदार होतात. त्या दृष्टीने 'मतिविकारा' चें कथानक उठावदार व परिणामकारक वाटत नाहीं.

पात्रांसंबंधी सहानुभूति वाटणें म्हणजे काय, असें कोणी विचारल्यास तें वर्णन करून सांगण्यापेक्षा उदाहरणानेच उत्तम प्रकारें स्पष्ट करतां येईल. उदाहरणार्थ, आपण सिंधु किंवा कोल्हटकरांचीं त्रिवेणी, कांता हीं पात्रें घेऊं. या पात्रांना दोष लावतां येण्यासारखें कांही नाहींच, असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण त्यांच्याकडे पाहतांच त्या व्यक्ति आपल्यासारख्याच आहेत, असें एकदम आपल्याला वाटतें आणि त्यांच्या सुखदुःखाच्या जीवनाबद्दल आपल्याला आपुलकी व जिव्हाळा वाटूं लागते.

'गुप्तमंजूष' नाटक प्रयोगदृष्ट्या अयशस्वी झालें, याबद्दल कुणालाहि आश्चर्य वाटणार नाहीं. 'वीरतनय' हें नाटक 'एकच प्याला', 'स्वयंवर' या नाटकांप्रमाणे जरी गाजलें नाहीं, तरी त्याचें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रयोग सामान्यत: यशस्वीच होत असत, असें दिसतें. कारण वीरतनयाने मराठी रंगभूमीवर एका नवीनच नाट्यसंप्रदायास सुरुवात केली. किंबहुना, पात्रांच्या पोषाखापासून तों संगीताच्या नवीन धर्तीच्या चाली प्रचारांत आणण्यापर्यंत त्यांनी नवीन गोष्टींना चालना दिली. या नाटकांत उत्कट असे नाट्यपूर्ण कांही प्रसंगहि आहेत. शूरसेनाचा कारावासांतील प्रवेश—शालिनीच्या आत्मत्यागाचा प्रवेश इ. या विधानाची साक्ष देतील. या नाटकाचे प्रयोग 'सौभद्र'—संशयकल्लोळा'—प्रमाणे आजहि का दिसत नाहीत, याचें कारण उघड आहे.

काकासाहेब खाडिलकर यांचीं गद्यनाटकें व पद्य-नाटकेंहि त्या त्यावेळीं यशस्वी झालीं. किंबहुना 'बायकांचें बंड' आणि 'कांचनगडची मोहना' या नाटकांनी महाराष्ट्र-नाटकमंडळीला लोकप्रियता मिळवून दिली, असें सांगतात. त्यानंतरची कितीं तरी खाडीलकरांचीं नाटकें मराठी रंगभूमीवर गाजली. पण, त्यांपैकीं एक 'स्वयंवर' आणि थोड्याबहुत प्रमाणांत 'मानापमाना'चा अपवाद वगळल्यास कितीं नाटकें, आजच नव्हे, तर सुमारें २० वर्षांपूर्वीहि रंगभूमीवर होती? 'बायकांचें बंड,' 'कांचनगडची मोहना,' 'प्रेमध्वज,' 'भाऊबंदकी—' हीं गद्यनाटकें प्रस्तुत लेखकाला तरी आजपर्यंत प्रयोगरूपाने पाहावयास मिळालीं नाहीत. म्हणून त्या नाटकांत प्रयोगक्षमता नव्हतीच, असें म्हणतां येईल का? अर्थात् त्या नाटकांची प्रयोगक्षमता आणि अन्य योग्यता 'सौभद्र,' 'संशयकल्लोळ' यांच्या जोडीची नव्हती, असें फार तर म्हणतां येईल.

गंधर्व-नाटक-मंडळीने सुरुवातच 'मूकनायका'च्या प्रयोगाने केली. रा. पु. रा. लेले देखील 'सौभद्रा'च्या खालोखाल 'मूकनायक'च त्यावेळीं लोकप्रिय होतें, असें सांगतात. 'मूकनायका'चें यश त्यांतील अत्युत्कृष्ट पदांच्या चालींमुळें प्रामुख्यानें दिसलें, असें रा. टेंबे देखील प्रस्तुत लेखकाजवळ बोलले आहेत. 'सौभद्र' नाटकाबाबतहि हें म्हणतां येण्यासारखें आहे. 'सौभद्र' नाटकाचा प्रयाग करणारा नटवर्ग पाहावा, म्हणजे सुभद्रेची भूमिका करणारे नट आपल्या संगीतामुळेच प्रामुख्याने लोकप्रिय होते, असें दिसून येईल. पण सौभद्राच्या यशांत या एका गोष्टीचेंच सर्वस्वी महत्त्व आहे, असें म्हणतां यावयाचें नाही.

'प्रेमशोधन' मात्र 'मूकनायकां'पेक्षा अधिक जरी नव्हे, तरी तितकें तरी का गाजलें नाही, याचें आश्चर्य वाटतें. मराठींतील कित्येक नाटकांपेक्षा 'प्रेमशोधन' सर्वच दृष्टीने श्रेष्ठ प्रतीचें नाटक आहे. पण त्या नाटकांतील लोकोत्तर आत्मत्याग व प्रेमनिराशेमुळे त्यांतील व्यक्तींना होणाऱ्या दारुण यातना बहुजनसमाजाला एकदम समजण्यास कठीण आहेत हें मात्र खरें. नटवर्य फाटक तर 'प्रेमशोधनांने तात्यांच्या नाट्यहिरकणीला अतिशय मोहक पैलू पडलेले आपल्याला दिसून येतील,' असें म्हणतात आणि त्यांतील कंदनाची भूमिका आपल्यास करावयास मिळाली, तर आपल्या नाट्य-कौशल्याची कमालमर्यादा दाखविण्यास त्यांत भरपूर अवसर आहे, असें त्यांनी प्रस्तुत लेखकाजवळ बोलून दाखविलें आहे. याच नाटकाला ललितकलेने १९३४ सालीं पुन: रंगभूमीवर आणलें. पण तोहि काळ एकंदरीने धंद्याच्या दृष्टीने वाईटच असल्यामुळे व नाट्यकला सर्वस्वी धंदेवाइकांच्याच हातीं असल्यामुळे धंदेवाईक नट रंगभूमीला कायमचे पाठमोरे झाले.

'प्रेमशोधना'च्या प्रयोगाबाबत, आपल्याला 'प्रेमशोधन' प्रथम रंगभूमीवर आलें असतां त्या नाटकाचें ज्यांनी प्रयोग पाहिलें अशा दोन नाट्यरसिकांची मदत घेतां येईल.

रा. पु. गो. काणेकर यांनी 'माझ्या कांही नाट्यस्मृति' या आपल्या ग्रंथांत आणि रा. पु. रा. लेले यांनी 'नाटक मंडळीच्या त्रिन्हाडीं' या ग्रंथांत 'प्रेमशोधना'च्या प्रयोगाच्या यशापयशांची चर्चा केली आहे; ती अत्यंत महत्त्वाची आहे. काणेकर म्हणतात—'एखादें नाटक (लोकप्रिय अर्थात् गल्लेभरूपणाच्या

दृष्टीने,) यशस्वी का झालें, हें सांगणें जसें कठीण असतें, तसेंच एखादें नाटक पडेल का ठरावें, हें सांगणेंहि कठीण जावें...पुष्कळ वेळा असें होतें कीं, एखादें साधारण नाटक असूनहि तें हजारों प्रेक्षकांना वेड लावतें आणि एखादें तितकेंच किंवा त्याहूनहि चांगलें असें वाटणारें दुसरें एखादें नाटक अल्पजीवि किंवा अयशस्वी ठरतें. त्यावेळीं मात्र साधारण प्रेक्षक हा एक अजब व गूढ प्राणी आहे, असें वाटल्यावांचून राहत नाही. कोल्हटकरांचें ' प्रेमशोधन ' आणि खाडीलकरांचें ' मानापमान ' ही दोन्हीं नाटकें एकाच म्हणजे किर्लोस्कर-नाटक मंडळीने थोड्या महिन्यांच्या अंतराने रंगभूमीवर आणलीं. परंतु ' प्रेमशोधन ' म्हणण्यासारखें लोकप्रिय झालें नाही आणि 'मानापमाना'ने तर कांहीं काळ प्रेक्षकांना वेड लावलें. ' मानापमान ' नाटक मी पाहिलें तेव्हा बालगंधर्व व जोगळेकर यांचीं गाणीं मला आवडलीं. परंतु नाटकगृहांतून बाहेर पडल्यावर त्या नाटकाचा मनोरा कशावर उभारला आहे, त्याचा मला लगेच विसर पडला. उलटपक्षी, ' प्रेमशोधनाचें ' संविधानक त्यांतील पात्रांचा स्वभाव-परिपोष, त्यांतील विनोद आणि त्यांतील सुंदर अर्थपूर्ण पदें हीं मला अतिशय आवडलीं. तें नाटक थोड्या खेळानंतर पडेल, अशी माझी तरी कल्पना नव्हती. '

रा. पु. रा. लेले यांनीं आपल्या ग्रंथांत ' प्रेमशोधनाच्या ' यशापयशाचीं कारणें दिलीं आहेत. अपयशाचीं त्यांनीं कारणें दिलीं, तीं अशी—(१) ' प्रेमशोधन ' नाटकाच्या प्रयोगांत बालगंधर्व दिसावयास फार उशीर होत असे. (२) नंदनाची भूमिका निर्जीव रेखाटली आहे. आणि, सगळा सजीवपणा कंदनाच्या भूमिकेंत घातला आहे. जोगळेकरांबद्दलचा कोल्हटकरांच्या मनांतला दुर्ग्रह ती भूमिका अधिकच निर्जीव बनविण्यास कारण झाला.(३)नाटकाच्या दर्जाच्या मानानें ' प्रेमशोधना'ला यश आलें नाहीं, असें माझें असंदिग्ध मत आहे. कोल्हटकर स्वत: त्या परिणामाबद्दल अंशत: जबाबदार आहेत. (४)खुद्द गंधर्वांनासुद्धा ' मानापमानां'तील पदें रंगवितांना जी स्फूर्ति वाटे, ती स्फूर्ति त्याच चालीवरची ' प्रेमशोधनां'तील पदें म्हणत असतांना वाटत नसे. 'मानापमाना'च्या प्रथम प्रयोगाचें वर्णन करतांना खाडीलकरांनी प्रेक्षकांची नाडी-परीक्षा कशी केली आणि अत्यंत उठावदारपणें गंधर्वाला नायिकेच्या वेषांत ताबडतोब प्रेक्षकांसमोर आणल्यामुळें प्रेक्षक कसे प्रसन्न झाले, तें वर्णन वाचण्यासारखें आहे.

' प्रेमशोधन ' जन्मकाळीं बरेच दिवस का गाजलें नाही, याचें कारण अंदाजानेहि ओळखतां येण्यासारखें आहे. याच नाटकापासून कोल्हटकर आणि किर्लोस्कर-नाटक-मंडळी यांचे परस्पर-संबंध तुटले. ' प्रेमशोधना 'नंतर अवघ्या ९ च महिन्यांत खाडीलकरांचें ' मानापमान ' (मार्च १९११) किर्लोस्करांच्या रंगभूमीवर आलें आणि त्या नाटकाच्या अपूर्व यशांत ' प्रेमशोधन ' पार वाहून गेलें ! ' प्रेमशोधनां 'तील अद्‌भुतरम्य वातावरणच मानापमानांत असलें, तरी थोड्या साधनांत जास्तींत जास्त परिणामकारकता साधण्याचें कौशल्य खाडीलकरांत भरपूर आहे, ही एक गोष्ट व ' मानापमानां 'तील अपूर्व संगीत या दोन कारणांनी ' प्रेमशोधन ' मागें पडलें. ' मानापमानां'पासून किर्लोस्करांच्या कर्नाटकी पद्धतीच्या पदांच्या चाली गेल्या. त्यानंतर आलेल्या व कोल्हटकरांनी प्रचारांत आणलेल्या फार्शी पदांच्या चालीहि लोपल्या व हिंदुस्थानी संगीत-पद्धतीच्या चाली प्रचारांत आल्या. पदांचा धावतेपणा व शक्य तों प्रसंग आणि रस यांना चिकटून राहण्याची प्रथा बंद पडून निरनिराळ्या रागांच्या चीजा मराठी रंगभूमीवर ऐकावयास मिळूं लागल्या आणि श्रुतिमधुर संगीताकरिता वेडा असलेला मराठी प्रेक्षक वर्ग गंधर्वांच्या गायनाने अगदीं नागासारखा डोलूं लागला ! १९११ सालापासून संगीत बोलपटांचा उदय होईपर्यंत मराठी संगीत रंगभूमीचें हें ' गंधर्व-युग' होतें, असें कुणी म्हटल्यास तें चुकीचें होणार नाही.

सारांश, कोल्हटकरांच्या पहिल्या पाच नाटकांपैकी ' वीरतनय, ' ' मूकनायक ' व ' प्रेमशोधन '

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ही प्रयागाच्या दृष्टीनेहि यशस्वी होण्यासारखीं नाटकें आहेत. जिव्हाळा असला, तर 'मतिविकारा'ला देखील प्रयोगक्षम करतां येईल. 'गुप्तमंजुषा' बाबत मात्र भरंवसा देतां येणार नाही.

बाकीच्या ७ नाटकांपैकी 'सहचारिणी' आणि 'जन्मरहस्य' हीं संगीत नाटकें आणि 'वधूपरीक्षा' हे मूळांतील गद्य नाटक एवढींच काय तीं रंगभूमीवर आलीं. बाकीचीं ४ नाटकें रंगभूमीवर आलींच नाहीत; 'श्रमसाफल्य' आणि 'मायाविवाह' हीं नाटकें प्रयोगाच्या दृष्टीने विचार करतां येण्यासारखीं देखील नाहीत, असें आम्हास वाटतें. 'शिवपाविव्य' देखील रंगभूमिवर यशस्वी होऊं शकलेंच असतें, असें म्हणवत नाही. कारण 'शिवपाविव्यां'त नाट्यपूर्ण प्रसंगांचा किंवा प्रयोगक्षमतेच्या दृष्टीने अन्य कोणत्याहि आवश्यक गुणांचा अभावच दिसून येतो. 'परिवर्तन' मात्र प्रयोगदृष्ट्या यशस्वी होऊं शकलं असतें, असें वाटतें. 'परिवर्तनां'तील संभाषणें वाचावींशीं वाटत नाहीत. त्यांना प्रसंगाचें व विषयाचें महत्त्वच वाटत नाही. पण हा दोष खेरीज केला असता 'परिवर्तन' देखील प्रयोगक्षम म्हणून यशस्वी होऊं शकलें असतें, असें वाटतें. पण दुर्दैव त्या नाटकाचें! 'सहचारिणी' आणि 'परिवर्तन' या नाटकांच्या वेळीं गंधर्व–नाटक–मंडळी आणि कोल्हटकर यांचें बिनसलें. आणि 'सहचारिणी'च्या अपयशानें 'परिवर्तन' रंगभूमीवर येऊं शकलें नाही!

'सहचारिणी' नाटक कोल्हटकरांच्या उत्तम नाटकांपैकीं एक आहे, असें आम्हास वाटत नाही. पण त्याच्या एकपट वाईटपणाला स्वत: नटांनीच दसपट वाढविलें! आणि त्याचा परिणाम 'सहचारिणी' नाटक पहिल्या १०-५ प्रयोगांतच पडलें! दिग्दर्शक आणि नट यांच्यांत प्रयोगासंबंधीं जिव्हाळा असला, म्हणजे प्रयोग यशस्वी करण्याच्या कामीं ते किती जीवापाड मेहनत करतात, हें पाहावयाचें असेल, तर पेंढारकरांनी 'श्री' नाटकासाठी घेतलेले परिश्रम आणि त्यांनी केलेली त्या नाटकाची सजावट उदाहरण म्हणून समोर ठेवतां येण्यासारखी गोष्ट आहे. 'सन्यस्त खड्गाचें' उदाहरण असेंच आहे. अगदी अलीकडचीं उदाहरणें द्यावयाचीं झाल्यास 'कान्होपात्रा' या नाटकासाठीं गंधर्वांनी उचललेले कष्ट विचारांत घ्यावे, म्हणजे आवडीने प्रयोग बसविणारा नटवर्ग आणि दिग्दर्शक कांहीं काल का होईना, कसें मातीचें सोनें करून दाखवूं शकतात, हें दिसून येईल. खुद्द 'सहचारिणी' नंतर प्रयोगरूपाने बाहेर आलेल्या 'द्रौपदी' नाटकासाठीं गंधर्वांनी किती पाण्यासारखा पैसा खर्च घातला, ही गोष्ट विख्यातच आहे. पण तेवढाहि जिव्हाळा नसला, तर कशाचीहि ते कशी माती करूं शकतात, याचें 'सहचारिणी' हें उत्कृष्ट उदाहरण आहे!

'सहचारिणी' नाटक पडलें, याबद्दल कुणालाहि तितकेंसें वाईट वाटणार नाही. कारण परिश्रमानेहि तें फार काळ टिकूं शकलें असतें, असें वाटत नाही. पण 'जन्मरहस्या'ने मात्र सर्वच बाबतींत उच्चांक गाठला आहे. उत्तरायुष्यांत या नाटकाकरिता 'मला केवळ दोनच उत्कृष्ट नट द्या, म्हणजे 'जन्मरहस्य' नाटक यशस्वी करून दाखवितों, पण तेवढेंहि कोणी करीत नाही!'—अशी कोल्हटकरांनी तक्रार केली आहे व प्रयोगाच्या यशस्वितेबद्दल खात्री दिली आहे. आपलें सर्व कौशल्य खर्च करून त्यांनी हें नाटक लिहिलें आणि त्यांची सर्व नाटकें नजरेसमोर ठेवलीं असतां त्यांनी तें खरेंहि करून दाखविलें असतें. अशा या नाटकाचा मात्र बलवंत संगीत मंडळीने—कदाचित् पैशाच्या भीतीने—चेंदामेंदा करून टाकला! जन्मरहस्य ही कोल्हटकरांची सर्वोत्कृष्ट कलाकृति, पण तिची वासलात मात्र सुंदर आणि सकस असें अपत्य केवळ अपघाताने मृत्यूमुखीं पडावें, अशा प्रकारें लावली गेली!

या नाटकाच्या निमित्ताने कोल्हटकरांच्या आत्मचरित्रांत जो उल्लेख आला आहे, त्यावरून नाटकाच्या यशापयशांत पद्यांच्या यशस्वितेला ते पहिलें स्थान देत असावे, असें दिसतें. कारण नाटकाला आलेल्या अपयशांत दिनानाथांकरिता

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हणून रघुनाथाला दिलेली गाणीं कोल्हापुरे यांना झेपण्यासारखीं नव्हतीं, म्हणून तें पडलें, असें एक कारण त्यांनी दाखविलें आहे. कांहीहि असो, 'जन्मरहस्य' नाटक पाहिल्यानंतर आजहि एखादा हौशी दिग्दर्शक मिळाला, तर तें यशस्वी होऊं शकेल, अशी खात्री वाटते. पण हें भाग्य त्या नाटकाला अजूनपर्यंत लाभलें नाही, हें मात्र खरें! एकंदरीने, कांही नाटकांतील कांही विशिष्ट प्रसंग अपवादाला सोडले, तर भावनोत्कटता कोल्हटकरांच्या नाटकांत क्वचित्च आढळते. बुद्धीला त्यांत भरपूर मेजवानी आहे. पण बुद्धिवाद हे नाटकांत चालावयाचे नाहीत. रा. पु. रा. लेले यांच्यासारख्या कोल्हटकरांच्या चहात्यांनी देखील कोल्हटकरांच्या कल्पकतेच्या मानाने त्यांचें नाट्यज्ञान फारच अपुरें होतें आणि वाढत्या वयाबरोबर हें ज्ञान वाढावयाच्या ऐवजीं संपुष्टांत येत चाललें, असा आपला अभिप्राय दिला आहे!

सारांश, नाट्यपूर्ण व भावपूर्ण प्रसंगांची उणीव कृत्रिम व असंभाव्य प्रसंगांची निवड व प्रतिपाद्य विषयाच्या परिणामकारक मांडणीचा अभाव याच गोष्टी त्यांच्या प्रयोगक्षमतेच्या आड आल्या आहेत. तरीहि 'जन्मरहस्य', 'प्रेमशोधन', 'मूकनायक', 'वीरतनय' आणि त्यांच्या खालोखाल "मतिविकार" हीं नाटकें प्रयोगाच्या दृष्टीने देखील यशस्वी होण्यासारखीं आहेत, यांत शंका नाही. पण या नाटकांची प्रयोगक्षमता 'सौभद्र', 'संशयकल्लोळ,' यांच्या तोडीची आहे, असें मात्र नाही.

राहतां राहिलें 'वधूपरीक्षा' हें मूळांतील गद्य नाटक! 'ललित कला दर्श' नाटक मंडळीने १९२८ सालीं संगीत स्वरूपांत पुनः रंगभूमीवर आणलें. या नाटकांतील कथानक अत्यंत कृत्रिम आणि गुंतागुतीचें असलें, तरी व्यक्तिचित्रण जिव्हाळ्यानें केलें आहे. त्यामुळें त्यांतील कांही व्यक्ति आपलें मन आकृष्ट करून घेतात. त्यांत नाट्यपूर्ण प्रसंगहि आलेले आहेत. आम्ही पाहिलेला "वधूपरीक्षे"चा प्रयोगहि ठाकठीक होत होता. पण तरीहि समाधान होईना, यांत शंका नाही! किंबहुना, कोल्हटकरांच्या सर्वोत्कृष्ट कृति वाचूनहि हाच अनुभव येतो!

यांचें कारण काय? बराच विचार केल्यानंतर असें वाटूं लागलें आहे कीं, कोल्हटकरांच्या नाट्यसृष्टींत भव्यतेचा, आदर्शाचा अभावच आहे! लहानापासून थोर नाटककार हे आपापल्या परीने जगाचें चित्र रंगवीत असतात. आणि, जीवन सकस होईल अशा सकस द्रव्याचें अमृत न बोलतां न कळूं देतां, अवसान अथवा आविर्भाव कांहीहि अंगांत न आणतां, आपल्या पिढीला पाजत असतात. खाडीलकरांची कोणतीहि कृति घ्या, इब्सनचें, शेक्सपियरचें कोणतेंहि नाटक घ्या, तें मुद्दाम आपल्याला कांही सांगताहेत, असें तर दिसत नाही; पण आपल्या मनांत मात्र आपण कांही तरी उदात्त असें पाहिलें–अनुभविलें, असें वाटूं लागतें. सामग्र्याने त्यांच्या कृतींचा विचार केला तर ते यथार्थतेने मानवी जीवनाचे विधायक टीकाकार वाटतात. पण कोल्हटकरांच्या कृतींत आधुनिक सुधारणेचा प्रादुर्भाव असूनहि माणसांत एखाद्या गोष्टीची आच असावी व त्या उच्च भूमिकेवरून 'केला जरी पोत बळेंचि खालें— या उक्तीप्रमाणे त्याला कुठेहि न्या, पण ती एकच एक गोष्ट सर्व ठिकाणीं ध्वनित व्हावी, असें कोल्हटकरांच्या कृति वाचून वाटत नाही. खाडीलकरांचा जाज्वल्य देशाभिमान, परकीयासंबंधीचा तिरस्कार, गुलामी मनोवृत्तीबद्दल त्यांना येणारा संताप आणि आपल्या संस्कृतिबद्दल, परंपरेबद्दल त्यांना वाटत असणारा स्वाभिमान त्यांच्या प्रत्येक कृतींतून उफाळून बाहेर येतो.

कोल्हटकरांच्या कृतींचें तसें नाही. सामाजिक सुधारणांसंबंधीचे त्यांचे प्रगट विचार प्रत्येक कृतींत आढळत असले, तरी त्यांच्या जीवाची आच तेथे दिसत नाही. साखरेबरोबर कडू चिराइताचा काढा देण्याची त्यांची इच्छा पण प्रत्यक्षांत मात्र कडु चिराइत नावापुरतेंच राहतें आणि साखर मात्र भरपूर दिसते! कोणतीहि उदात्त आणि आदर्श अशी त्यांची भूमिका असण्यापेक्षा—वैचित्र्याच्या, सौंदर्याच्या मागें लागलेले कलाकार या नात्यानच ते प्रामुख्याने

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दिसतात. निव्वळ 'कलेखातर कला' असा त्यांच्या मनाचा कल दिसत नसला, तरी त्यांच्या कलाकृति जीवनाचा कोणता आदर्श निर्माण करतात, कोणती भव्यता व उदात्तता त्यांत वसते, हें सांगणें कठीण! कोल्हटकरांच्या अपयशाला हेंहि एक कारण शक्य आहे आणि याचमुळें त्यांची कोणतीहि नाट्यकृति वाचून मानसिक भूक भागत नाहीं. खाडिलकरांच्या प्रभावी व कलापूर्ण तत्त्व प्रतिपादनांत त्यांची बेडौल विनोदी पात्रें—ओजस्वी पण वर्तमानपत्री छापाची भाषा—कष्टानेंहि काव्यगुण आढणार नाहींत अशीं नीरस पदें दिसत असूनहि 'नाट्याचार्य' पदाचा मानाचा जरीपटका त्यांच्याकडे जातो!

याचें कारण काय?— मला वाटतें, याचें उत्तर असें. जें प्रयोगदृष्ट्या यशस्वी आहे आणि ज्यांत मानवी जीवनाचें सत्य दर्शन घडून मानवी जीवनावर जें अधिक प्रकाश पाडतें, तें उत्कृष्ट नाटक होय. अशीं नाटकें केवळ रंजनानेंच आपल्याला आनंदित करतात, असें नव्हे, तर त्यांना पाहून मनुष्याची मानसिक भूकहि भागते!

●

रात सरे, रवि उगवे—

रात सरे, रवि उगवे
निद्रा गेली उडुनी
'काल' पुन्हा वावरतो
माझ्या हृदयामधुनी १

दुःख निराशा फिरुनी
जीवा टोचुन घेती
फाकत जरि तेज नभीं
काळी हो मम जगती! २

—देवा तूं स्मृति आम्हां
दिधली हा शापच का!
हिंस्र खगापरि लचके
जीवाचे तोडित का! ३

दिवसादिवसामधुनी
बीण—स्मृति जर नसती
ही जगती सौख्यामधि
राहिलि नाहत असती! ४

—गो. रा. दोडके.

● ● ●

चोरबाजारांतील चिजा—

लेखिका : कु. मृणालिनी राय
अनुवादक : यशवंत शास्त्री.

● परदेशांतील गोष्टींविषयीं प्रत्येकालाच जिज्ञासा आणि कुतुहल वाटत असतें. लंडनमधील जीवनासंबंधीच्या अनेक गोष्टी वाचकांच्या वाचण्यांत आल्या असतील. परंतु, कु. मृणालिनी राय यांनी, तेथील पेटिकोट लेन नावाच्या विभागाचें जें मजेदार वर्णन केलें आहे, तें सर्वांनाच आकर्षक वाटेल आणि त्या दृष्टीने त्यांच्या एका लेखाचा स्वैर अनुवाद सादर करण्यांत येत आहे. ●

* * *

लंडनमध्ये आल्यानंतर त्या दिवशीं अगदी प्रथमच मी माझी मैत्रिण जोन हिच्यासोबत 'पेटीकोट लेन' पहावयास गेलें होतें. ईस्ट एण्ड नामक लंडनमधील वस्तींत गरीब लोकच रहातात; आणि पेटीकोट लेन ही त्या विभागांतील गरीबांची एक बाजारपेठ आहे. रविवारच्या दिवशीं लंडनमधील वे दुकानें बंद असतात; परंतु ही बाजारपेठ मात्र त्या दिवशीं उघडी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असते. घरांतून बाहेर पडण्यापूर्वी जोन मला म्हणाली, "आपली वेणी नीट झाकून ठेवायला विसरूं नकोस, हं!"

"का?" मीं आश्चर्याने विचारलें.

"बाजारांतून जात असतांना तुझे हे लांबसडक केस कापले नि चोरून नेले, तर आपण जबाबदार नाही, बुवा!" जोन म्हणाली.

"तूं थट्टा करतेस, झालं!" मी म्हणालें "बाजारांतून चालतांना कोणी केस कशाला कापील!"

"मग तुला ह्या पेटिकोट लेनचा पत्ताच नाही मुळी! तेथे तर चालतां चालतां हातांतली पर्स लांबवणें किंवा कोणाचे सोनेरी सुंदर केस नकळत कापलें जाणें ह्या गोष्टी म्हणजे कांहीच नाही! जर तुझी ही वेणी कापलीच गेली, तर ती तुला एकाद्या सलूनमध्ये कांचेच्या फडताळांतच मोठ्या समारंभाने विक्रीसाठी ठेवलेली दिसेल!"

"हं, अस्सं!" मला व्हिक्टर ह्यूगोच्या 'पॅरिसच्या कुबड्या' ची आठवण झाली आणि पेटिकोट लेन पाहण्याची इच्छा अधिकच बळावली.

जोन म्हणाली, "ईस्ट एण्ड ही केवळ लंडनमधील गरीबांचीच वसती नाही, तर तें येथील चोरबाजाराचें एक केंद्रहि आहे. ह्या चोरबाजारांत वस्तू विकून आणि विकत घेऊन कित्येक लोक कोडोपति झालेले आहेत. आणि मला क्षमा कर ..." कांहीसे अडखळत ती पुढे म्हणाली, "ह्या चोरबाजारांत तुमचें हिंदुस्थानी लोकसुद्धा बऱ्याच प्रमाणांत सामिल आहेत; आणि त्यांच्यासारखेच इंग्रज, चिनी, अरबी हेहि लोक तेथे असतातच!"

"असं आहे म्हणतेस-तर चल लौकर!" मी म्हणालें.

आम्ही पेटिकोट लेनकडे जाण्यासाठी बसमध्ये बसलों. शेजारीच लढाईतून निवृत्त झालेला एक जखमी इंग्रज शिपाई बसला होता. त्याला पाहून नशीब, ईश्वर, मृत्यु, साम्यवाद, ॲटम बॉंब आणि नाही नाहीं त्या गोष्टींची आमच्यांत चर्चा झाली. वेळ कसा निघून गेला, तें कळलेंसुद्धा नाही. आम्ही पेटीकोट लेनमध्ये आलों. बाजारांत लोकांच्या झुंडी वावरत होत्या. चालतां चालतां जोन म्हणाली, "आपली पर्स सांभाळ बरं का!"

मीं एकाएकीं हाताने आपली वेणी चाचपली आणि ती शाबूत आहे की नाही तें पाहिलें. पदराने वेणी पुन्हा झाकली आणि जोनचा हात धरून चालूं लागलें.

लंडनच्या बाजारपेठेंत बहुधा खूपच गर्दी असते. परंतु येथे ज्या प्रकारची गर्दी दिसली, ती पाहून मला हिंदुस्थानांतील दसऱ्याच्या दिवशीं होणाऱ्या गर्दीचीच आठवण झाली. ठिकठिकाणीं आईस्क्रीम विकणारे आपल्या हातगाड्या घेऊन उभे होते व त्यांच्या भोंवती स्त्री, पुरुष व मुलें यांची सारखी गर्दी होत होती. लंडनमधील श्रीमंत अगर मध्यमवर्गीय लोकांत आणि येथील ह्या लोकांत फारच तफावत होती. ज्या बाईचे केस विंचरलेले नसतील, किंवा ज्या पुरुषाच्या अंगावर इस्त्री केलेले कपडे नसतील असे लोक लंडनच्या रस्त्यावर क्वचित्च दृष्टीस पडतील. परंतु ईस्ट एण्डमध्ये पाऊल ठेवतांच, आपण हिंदुस्थानमधील लोकांच्या अधिक जवळ आलों आहोंत की का, असा मला भास झाला. येथें विखुरलेले केस, फाटलेलीं पादत्राणें, ठिगळ लावलेले कपडे अशा अनेक गोष्टी माझ्या दृष्टीस पडल्या. कित्येक मुलें कमालीचीं घाणेरडीं असलेलीं दिसलीं.

तीन-चार वळणें घेतल्यानंतर आम्ही पेटीकोट लेनच्या खऱ्या बाजारपेठेंत आलों. तेथील गर्दी आणि दुकानांची ठेवण पाहून मला दिल्लीच्या हनुमान मंदिरांतील मेळ्याची आठवण झाली. फरक इतकाच की, पेटीकोट लेनमधील बाजाराचा हा मेळा, मंगळवारीं दिल्लीस भरणाऱ्या मेळ्याहून चारपांच पटींनें मोठा होता. एकीकडे, बॉम्बहल्ल्यामुळे उध्वस्त झालेल्या एका घराच्या पडक्या भिंतीशीं उभें राहून एक धट्टाकट्टा पहेलवान कांही तरी जोरजोराने बोलत होता. अनेक स्त्री-पुरुष आणि तरुण त्याच्या भोंवती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उभे होते. पडक्या भिंतीवर टांगलेल्या एका तक्त्यावर ‘Health Crusade’ अशीं अक्षरें लिहिलीं होतीं. पहेलवानसाहेबाच्या हातांत एक डबी होती आणि ती लोकांना दाखवीत तो म्हणत होता, “ही एक गोळी पंधरा वर्षांच्या मुलालासुद्धा जवानमर्द करते– बारा वर्षांच्या मुलीला नवयुवती करून सोडते...पण बंधू-भगिनींनो, हें औषध केवळ मोठ्या वयाच्या लोकांसाठींच आहे...लहान वयाच्या व्यक्तींनी हें औषध चुकूनहि घेऊं नये...ह्या औषधामुळे आजपर्यंत बरबाद झालेलीं शेकडों घरें पुन्हा आबाद झालेलीं आहेत, हें विसरूं नका! हें औषध घेतलेल्या लोकांनी दिलेल्या प्रशस्तीपत्रांचा हा गठ्ठा पहा... हीं प्रशस्तीपत्रें वाचण्यांत मी वेळ घालविणार नाही...तुमच्यामधून ज्यांनी ह्या औषधाचा अनुभव घेतलेला आहे, त्यांनी कृपा करून आपला हात वर करावा...” पहेलवान-साहेबांच्या विनंतीला मान देऊन एकानेंहि हात वर करण्याची कृपा केली नाही. तेव्हा पहेलवान-साहेब एक निःश्वास टाकून म्हणाले, “हं! आज येथे सर्वच लोक नव्याने आलेले दिसतात! बरें ज्यांना औषध हवें असेल, त्यांनी तीन तीन शिलींग देऊन तें घेऊन जावें...”

ह्या ‘हेल्थ क्रूसेड’च्या गर्दीतून आम्ही पाय काढला व पुढे चालूं लागलों. फण्या, ब्रश, आरसे, पिना, फीत, पिशव्या, चमचे, पेले वगैरे सामान सजविलेलीं छोटीं छोटीं दुकानें दिसलीं. हा सर्वच माल तेथे कमी अधिक भावांत विकला जात होता. शहरांतील बड्या दुकानांतून दिसणार नाहीत अशाहि कांही वस्तू तेथे असलेल्या दिसल्या. गिऱ्हाईकांचें लक्ष्य वेधावें म्हणून हे फेरीवाले लंब्याचवड्या स्वरांत गाणीं म्हणत होते. मातीच्या खेळण्याची सर्रास विक्री चालू होती. एका ठिकाणीं कांही स्त्री–पुरुष आपल्या घड्याळांवर नावें खोदून घेण्यांत दंग होते. येथील वातावरण अगदी हिंदुस्थानी वाटणीचें होतें. कोणत्याहि दुकानासमोरून जाऊं लागतांच दुकानदार म्हणायचा, “Have a look this side too, Miss!’ आणि ‘Only a few left!’ हीं वाक्यें ऐकून दिल्लीतील चांदणी चौकांत असलेल्या दुकान-दारांची आठवण झाली.

“जरा इकडे तर बघ’– जोन म्हणाली. मी उजवीकडे वळून पाहिलें. एक हिंदुस्थानी जोडपें एका ठेल्याशेजारीं उभें राहून हिंदी अत्तरें विकीत होतें. त्यांच्या कपड्यालत्त्यावरून ते थेट हिंदु-स्थानी वाटत. त्या जोडप्यापैकी नवऱ्याने आम्हांला हिंदुस्थानी पद्धतीचा नमस्कार केला आणि बोलण्यास सुरुवात केली. येथें अत्तराच्या विक्रीचें काम तें जोडपें गेलीं दहा वर्षें करीत असल्याचें त्याने सांगितलें. लोक त्यांच्याकडे शिलींगाचें नाणें फेंकीत आणि अत्तर विकत घेत. त्या अत्तरांची तेथे भरदार विक्री चालू असलेली पाहून मला आश्चर्य वाटलें. कांही उदबत्त्या विकत घेऊन आम्ही पुढें चालूं लागलों.

थोडे पुढे गेलों नाही तोंच पांढरा फेटा बांधलेल्या एका वृद्ध हिंदी गृहस्थाची गांठ पडली. आपल्या गळ्यांत एक ‘ट्रे’ अडकवून तोहि अत्तराचीच विक्री करीत होता. पगडी घात-लेला एक हिंदुस्थानी गृहस्थ आणि साडी नेसलेली स्त्री ह्या दोघांना नमस्कार करीत असलेले पाहून कांही इंग्रज लोकांना तो एक चमत्कारच वाटला व त्यांची गर्दी आमच्या भोंवती गोळा झाली. तो गृहस्थ हिंदींत म्हणाला, “अपने देसकी बेटी को मिलकर बहुत खुशी हुआ. कौन जात हो, बेटी?”

“ब्राह्मण-’’ मी उत्तर दिलें.

“आहे, ब्राह्मण!’’ त्याने पुन्हा वाकून नमस्कार केला. मी लंडनमध्ये आहे की गढ-मुक्तेश्वराच्या यात्रेंत आहे, असें कांही वेळ मला वाटत राहिलें. येथे आल्यानंतरहि मला माझी जातपात कोणी विचारील, असें वाटलें नव्हतें. मी विचारलें, “बाबाजी, आपल्याला येथें येऊन किती दिवस झाले! आपण येथें काय करतां?”

तो म्हणाला, “बेटी, हाच ‘सेंट’चा व्यापार करतों. पहिले माझा मुलगा येथे आला. तो लवकर हिंदुस्थानांत परत येईना. त्याचा येथे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'बिझिनेस' होता. तेव्हा त्याची आई आणि बहीण यांना घेऊन मीच येथे आलों. गेलीं दहा वर्षें येथेच आहे."

"व्यापार तर ठीक चालतो आहे ना, बाबाजी?" मी विचारलें.

"हां, बेटी" तो सांगूं लागला, "ईश्वराच्या कृपेने माझ्या येथे दहा-बारा इमारती आणि एक 'रेस्टरॉं' आहे. वेळ मिळाल्यास घरीं या."

त्याने एक 'व्हिजिटिंग कार्ड' मला दिलें. त्यावर त्याचा पत्ता होता. त्यानंतर पलिकडे भिंती शेजारीं उभ्या असलेल्या एका वृद्ध बाईकडे अंगुलिनिर्देश करून ती आपली पत्नी असल्याचें त्याने सांगितलें आणि मी तिला भेटावें, अशी इच्छाहि प्रकट केली.

मी त्या वृद्ध हिंदी बाईजवळ गेलें व तिला नमस्कार केला. तिने महाराष्ट्रीय पद्धतीची साडी परिधान केली होती आणि कपाळावर मोठें कुंकू होतें. साडीवर एक पुरुषी ओव्हरकोट घातला होता आणि पायांतहि मर्दानी जोडे होते. शेजारीं एका सूटकेसमध्ये अत्तराच्या बाटल्या होत्या. बोलतां बोलतां मीं विचारलें, "बाई, आपण हिंदुस्थानला परत केव्हा जाणार?"

"वापिस कैसा जायगा? इदर बिजनेस् जो है, बिजनेस् छोडकर कैसा जायगा?" ती म्हणाली.

"तुम्ही इंग्रजी तर शिकलांच असाल!"

"नाही. इंग्रजी शिकण्याची काय गरज! बाबूजींना इंग्रजी बोलतां येतें. मुलगा शिकला-सवरला आहे. मला इंग्रजी शिकण्याची काय गरज!"

"होय-बरोबर आहे."

"आमच्या घरीं या केव्हा तरी—"

जोनचें वारंवार हातावरील घड्याळाकडे पाहणें चालूं होतें. परत फिरण्याची वेळ झाली, हें ती अपरोक्ष रीत्या सुचवीत होती. वास्तविक गोष्ट अशी होती की, आम्हीं काय बोलत होतों तें जोनला समजत नव्हतें. एकीकडे ताटकळत उभें राहण तिला आवडत नसावें. तेव्हा 'जरूर येईन. बरें-नमस्कार' असें म्हणून मी त्या म्हातारीचा निरोप घेतला.

आज ज्या भेटीगाठी झाल्या, त्यांमुळे मी तर अगदी आश्चर्यचकीतच होऊन गेलें. लंडन-मध्ये आल्यानंतर अशा रीतीनें हिंदी बांधवांची गाठभेट होईल, असें स्वप्नांतहि वाटलें नव्हतें. जोनचा हात धरून आम्ही परत चाललों होतों. मागून कोणी तरी एकाएकी माझ्या खांद्यावर हात ठेवला. माझी वेणी! मी घाबरून मागे वळून पाहिलें. एक हिंदी इसम उभा राहून माझ्याकडे हसत हसत पाहात होता. तो नाविकदलांत असावा. तो मोठ्या अदबीने पंजाबी भाषेंत म्हणाला, "माफ करना, तुसानूं, रोक लया है. पर बडी देर होगई है अपनी वतन की किसी खातून को देखे!"

दाढी, मिशा, केसाला मेहेंदी लावलेली आणि डोळ्यांत सुरमा घातलेला तो एक उंचापुरा पठाण होता. लहाणपणीं पठाणांसंबंधी ज्या भयंकर गोष्टी मीं ऐकल्या होत्या त्यासंबंधींची धडकी अजूनहि माझ्या मनांतून गेलेली नव्हती. ह्या उंच्यापुऱ्या, सुडौल आणि भरगच्च लोकांच्या नजरेंत जी एक-प्रकारची अजब चमक दृष्टीस पडते, तिची आठवण झाली की, अद्यापहि भीति वाटते. पण परदेशांत असतांना, आपल्याच देशांतील भेटलेल्या माणसाला टाळतां येणें शक्य नव्हतें. त्याने विचारलें, "केव्हा आलांत येथे? येथे काय करतां? तुम्हाला पाहून—आपल्या देशांतील माणसाला पाहून—आज आत्मा शांत झाल्यासारखा वाटत आहे!"

"होय, आपल्या देशांतील माणसेंहि येथे कमीच आहेत"— मी म्हणालें.

"तुम्हाला पाहून मला खूप आनंद झाला—इथे तुम्ही काय करता?"

"शिकतें"—

"इतकें वय झालें आणि शिकतां आहांत तुम्ही! शादी झाली की नाही?"

"नाही!"

"शादी नाही झाली! आता तुम्ही शादी करावयास हवी-पण हें पहा, इकडच्या इंग्रजी माणसाशीं शादी करूं नका!"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" नाही-इंग्रज माणसाशीं नाही करणार शादी !"

" आतां लवकर लवकर हें शिकणें थांबवा. आपल्या घरीं परत जा. तेथे गेल्यानंतर शादी करा. "

" ठीक आहे." मी एकाद्या आज्ञाधारक बालकाप्रमाणे म्हटलें.

" आणि हें पाहा–" तो म्हणाला, आपल्या आई-वडलांच्या पसंतीनेच मुलगा शोधावयाचा, बरें का ? स्वत: मुलींनी आपला नवरा शोधूं नये. तें काम आई-वडलांचेंच !"

" नाही– मी आपल्या पसंतीने शादी नाही करणार ! आपल्या आई-वडलांच्या संमतीनेच करीन ! बरें, मला लवकर घरीं जायचं आहे. अच्छा, सलामालेकुम् !

" ओ, जरा थांबा. थोडीशी मिठाई विकत घेऊन देतों. अपने वतन का आदमी है ! "

" नाही. नको मिठाई. शुक्रिया. मला लवकर जायचं आहे. सलामालेकुम् ! " इतकें बोलून मी जोनचा हात धरला आणि गर्दींतून बस-स्टँडकडे धावत निघालें.

" तो म्हातारा इसम फारच मजेदार होता. काय सांगत होता तो तुला ? " जोनने विचारलें.

" तो सांगत होता की, शिक्षण सोड नि आपल्या आई-वडलांच्या पसंतीने लग्न लाव ! येथे राहून तुम्हां लोकांच्या संगतींत मी बिघडून जाईन, अशी त्याला भीति वाटत होती ! "

जोन मोठ्याने हंसली. मीहि तिच्या हसण्याला साथ दिली.

आम्ही बसमध्ये बसलों. मी आपली वेणी शोधून पाहिली. ती आपल्या जागीं शाबूत होती. मला हायसें वाटलें.

इंग्रज कादंबरीकार चार्ल्स डिकन्सचा जमाना आता इंग्लंडमध्ये राहिलेला नाही. इंग्लंड त्या वातावरणापलीकडे गेलेलें आहे. परंतु लंडन-मधील गरीबांच्या वस्तीवर, त्यांच्या जीवनावर आणि तेथील चोरबाजारावर एक सुंदर कादंबरी लिहितां येईल, अशी नाविन्यपूर्ण सामुग्री आजहि तेथे आहे.

पाहिलेल्या गोष्टींचा विचार करीत आम्ही घरीं केव्हा आलों, तें कळलें सुद्धा नाही.

दारांत पाऊल ठेवतांच मी पुन्हा आपली वेणी चांचपून पाहिली. ती शाबूत होती. जोन मात्र माझ्याकडे पाहून अधुनमधून मिस्किलपणाने हसत होती !

• • •

(लि. आ. म.)

औद्योगिक वृत्तविशेष

(प्यारामाउंट पब्लिसिटी सिंडिकेट लि. तर्फे प्रकाशित.)

उद्यम एंजिनिअरींग लि., पुणे हा कारखाना स्वतःच्या नवीन एरंडवणे येथील साडेतीन एकरांच्या विस्तीर्ण जागेंत ता. १५ जानेवारी १९४८ पासून चालू होणार आहे. तेथे स्टोव्हज् करण्याचा अभिनव उपक्रम कंपनी प्रथम हातीं घेईल.

पट्ट्याचे लहान मोठे बरे करणाऱ्या दि ट्रिनिटी मेटल् वर्क्स लि., मुंबई या कंप-नीचा स्ट्याच्युटरी रिपोर्ट मुक्तांच बाहेर पडला. कंपनीचे जमा भांडवल रु. ३,६७,८०० पर्यंत गेलें आहे. कंपनीच्या संचालक मंडळानें एक लक्ष रु. च्या ठेवी घेण्यास परवानगी दिली आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स्चें नुकतेंच दहा लक्ष रु. च्या खाजगी लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें असून कंपनीच्या संचालक मंडळांत श्री. शंतनुराव किर्लोस्कर, श्री. शेंबवेकर, श्री. बाबासाहेब साळवेकर प्रभृति मंडळी आहेत. या कंपनीनें नुकतेंच अमेरिकेंत रबरी खेळण्यांचें १०,००० डॉलर्सला पेटंट विकत घेतलें आहे, तसेंच हिंदुस्थान सरकारनें कंपनीला मशिनरी घेण्यासाठीं एक लक्ष डॉलर्सची परवानगी दिली आहे.

इंडियन ब्लेडस् ॲंड शार्प मेटॅयालिक्स लि., पुणें या कंपनीची अमेरिकन मशिनरी फेब्रुवारीमध्यें हिंदुस्थानांत आयात होईल. कारखाना ग्वाल्हेर येथें चालूं होणार असून तेथें रोज दीड लक्ष ब्लेडस्चें उत्पादन होईल.

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें या कंपनीनें गेल्या वर्षाकरितां १० टक्के डिव्हिडंड वाटण्याचें योजिलें आहे.

मोती प्रॉडक्ट्स्, सोलापूर या सुदर्शन एग्युमिक्श्चर व मोती सौंदर्यप्रसाधनें यांच्या कारखानदारांनी मद्रास इलाख्यांत विक्रीची संघटना केली असून तिकडे मालाला मागणी वाढूं लागली आहे.

टिंक्चर्स, एक्स्ट्रॅक्ट्स्, लिनीमेंटस्, सायरपस्, इंजेक्शन्स, कीटकनाशकें इ. माल मागोरा केमिकल कंपनी पुणें २ सध्यां मोठ्या प्रमाणांवर करीत आहे. कोडोरा (जनरल टॉनिक) मागोकोडी ग्लायशाका (खोकल्यावर), स्कॅबोरा, इ. नवीन पेटंटस् कंपनीनें नुकतींच बाजारांत आणलीं आहेत.

बडोदा आयुर्वेदाश्रम ॲण्ड फार्मास्युटिकल वर्क्स लि., या कारखान्याची मुख्य कचेरी लोणावळा येथें आली असून लवकरच तेथें आधुनिक पद्धतीवर कारखाना चालूं होईल. मुख्यत्वें आयुर्वेदीय पायावर फार्मास्युटिकल प्रॉडक्ट्स् तेथें तयार होतील.

बडोदा ब्याटरीज लि., या कारखान्याची पुनर्घटना झाली असून मालाचें उत्पादन लवकरच जोरांत होईल.

महाराष्ट्र टेक्निकल अेज्युकेशन सोसायटीच्या विश्रामबाग येथील न्यु इंजिनियरींग कॉलेजच्या रेसिडेन्सीसाठीं सांगलीच्या श्रीमंत राजेसाहेबांनी अेक लक्ष रु. ची लांब मुदतीची ठेव देण्याचें कबूल केलें असून जानेवारींत कामाला सुरुवात होईल.

सुप्रीम म्युच्युअल लाइफ ॲशुरन्स कं., पुणें चे सेक्रेटरी श्री. त्र्यं. दा. देशपांडे डिसेंबरमध्यें विम्याचे कामांत विशेष वाढ दिसल्यामुळें मध्यप्रान्त, खानदेश वगैरे भागांत दौऱ्यावर जाऊन आले. कंपनीच्या ठिकठिकाणच्या शाखांनी आतांपर्यंत चांगलेंच यश मिळविलें आहे.

ब्यांक आफ पूना लि., पुणे या शेडयुल्ड ब्यांकेने कॉलेज विद्यार्थ्यांना परीक्षेची फी द्यावयास अडचण भासूं नये याकरिता फी साठी द. म. द. शेंकडा फक्त चार आणे व्याजाने कर्ज देण्याचा उपयुक्त उपक्रम चालूं केला आहे.

कैसो ल्याबोरेटरी आणि पर्फ्युमरी अहमदनगर ह्या कारखान्यानें कैसरी इंडस्ट्रियल्स लि. यांना आपल्या मालाचे डिस्ट्रिब्यूटर्स नेमले असून महाराष्ट्र व कर्नाटक या भागांत त्यांच्या मालाचा प्रसार चांगला होत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बँक ऑफ महाराष्ट्र लि., नें पुण्यांत विश्रामबागवाड्यासमोर २०,००० चौरसफूट अशी मध्यवर्ती जागा खरेदी केली असून तेथें भव्य व सोयीस्कर इमारत बांधण्याची तयारी चालली आहे. या इमारतींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची मोठ्या प्रमाणावर व्यवस्था होईल.

वी. तांबे लि. मुंबई यांच्या फोर्टमधील विश्रांतिगृहांत नीराविक्रीचें केंद्र सुरू होत आहे. मुंबईत एकूण वीस ठिकाणीं नीराविक्रीचीं केंद्रें उघडण्यांत येत असून तीं कोठें ठेवावयाचीं हें काम श्री. वा. वि. तांबे यांच्याकडे सोपविण्यांत आलें आहे.

पाश्चात्य देशांत तयार खाद्यपदार्थ विशेष विकले जातात. रुचिर सिद्धान्न कार्यालय (३९७ नारायण, पुणें) यांनीं गेलीं १४ वर्षें सिद्ध खाद्यपदार्थांचें उत्पादन चालविलें आहे. "रुचिका टॉफी", "सिद्धसार" व लोणचीं विशेष लोकप्रिय झालीं आहेत.

प्रोग्रेसिव्ह अग्रिकल्चरल इंडस्ट्रीज लि. ने उसाचें बेण्यासाठीं लागवडीची योजना पुरी केली आहे. कंपनीला मुंबई सरकारचे माजी दुर्जलशेती संशोधन तज्ज्ञ डॉ. व्ही. एन. गोखले यांचा सल्ल्याचें सहकार्य लाभलें आहे.

ट्रस्ट ऑफ इंडिया अशुअरन्स कंपनीनें पुणे येथें लक्ष्मीरोडवर गोखले हॉल शेजारी प्रशस्त इमारत खरेदी केली आहे.

निवळ हातसुताची हातमागावरील खादी विकणाऱ्या पुणें येथील खादी मंदिराच्या मालकांना मुंबई सरकारतर्फे असें समजाविण्यांत आलें आहे कीं, त्यांच्या दुकानाच्या पाट्यावरून तसेंच देण्यात येणाऱ्या बिलावरून "खादी" हा शब्द अजिबात काढून टाकावा.

प्यारामाउंट पब्लिसिटी सिंडिकेट लि. पुणें २ यांनीं सुरू केलेल्या औद्योगिक वृत्त वितरणाच्या योजनेला वृत्तपत्रें व उद्योगधंदे यांचें चांगलें सहकार्य मिळालें असून कंपनी त्याबद्दल त्यांचे जाहीर आभार मानीत आहे.

महाविदर्भ साहित्य-सम्मेलन, गोंदिया

विदर्भ साहित्य संघाच्या विद्यमाने महाविदर्भ साहित्य-सम्मेलनाचे अकरावें अधिवेशन गोंदिया येथे दिनांक ७ व ८ मार्च १९४८ रोजी भरविण्याचे निश्चित झाले आहे. गोंदिया हें संयुक्त महाराष्ट्राच्या अतिपूर्व सिमेवरील भंडारा व बालाघाट या दोन जिल्ह्यांचे स्वाभाविक व नैसर्गिक केंद्रस्थान आहे. गोंदियावरुन कलकत्ता व मुंबईस जोडणारा मुख्य रेलमार्ग जात असुन जबलपूर व चंद्रपूर (चांदा) येथून येणारे रेलमार्गहि येथेच केंद्र करतात. भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाशी भाषेने व संस्कृतीनें एक असलेल्या, उद्योगधंदे, कृषि आणि खनिज संपत्तीनें समृद्ध असलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या या भूमिभागाचा जिव्हाळ्याचा संबंध आहे आणि संयुक्त महाराष्ट्रानें दाखविलेल्या जनमतावरच या दोन जिल्ह्याचें भवितव्य अवलंबून आहे. या गांवी येण्याकरिता नागपुराहून दररोज चार गाड्या येतात. पैकीं एक गोंदिया लोकल आहे. जबलपुराहून रोज दोन गाड्या येतात व चांद्याहून रोज एक येते. बंगाल नागपूर रेल्वेचे गोंदिया हें एक मोठें केंद्र आहे.

येथील संमेलन सर्वांनाच आवडेल असे घडविण्यासाठीं स्वागत समिती झटत आहे. कार्यक्रम निश्चित झाल्यावर तपशीलवार प्रसिद्ध होईलच. परंतु येथे जवळच महाकवी भवभुतीचे स्फूर्तीजन्म स्थान पद्मपूर व महानुभवी क्षेत्र डाकराम सुकळी हें असल्यामुळें कांहींना हीं स्थळें पाहण्याचा मोह होणें साहजिक आहे. अशांनीं आतांपासून आम्हांस कळविल्यास पाहुण्यांना होणारा त्रास कमी करण्याचा प्रयत्न आम्हांस करतां येईल.

म्हणून संपूर्ण संयुक्त महाराष्ट्रांतील व बृहन्महाराष्ट्रांतील विद्वान वक्ते, लेखक, संशोधक, नाटककार, इतिहासकार, कवी, शास्त्रज्ञ, राजकारणी व साहित्यप्रेमी यांस सम्मेलनाची स्वागत समिती अत्यंत आग्रहाचें आमंत्रण देत आहे.

गोंदिया
ता. १५।१२।४७

वी. अ. लिमये वकील
गोंदिया
महाविदर्भ साहित्य सम्मेलन
गोंदिया

स्वागत समितीच्या वार्ता विभागातर्फे

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

" युगवाणी " (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104/Genl I A
अन्वयें ' युगवाणी ' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

' रीटा 'मुळें आकर्षक केस–उगवतात



केससमृद्धिसाठीं ' रीटा ' हें एक नवीन साधन आहे. केसांच्या मुळांतील नैसर्गिक स्रवणास त्याने पोषण होते. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने सगळ्या केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसांसाठीं तें उत्तम आहे. ' रीटा 'ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळते. ×

RITA
HAIR TONIC

व्हेटो कंपनी, जोहान्स स्ट्रीट मद्रास,



डोंगरे यांचे बालामृत

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून ' युगवाणी ' कार्यालय १९, ४२९ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ